महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, रोजगार व उद्योजकता विभाग, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, टू-व्हीलर मेकॅनिक, A.C. मेकॅनिक, कॉम्प्युटर ऑपरेटर, ऑटोमोबाईल टेक्निशियन, मोटार वायडिंग, फोर व्हीलर मेकॅनिक, वेल्डर / प्लंबर, कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे परसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्अॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ३५ वा | शनिवार, दि. २३ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

मुख्यमंत्री फडणवीसांकडून सोलापूरकरांना आयटी पार्कचे गाजर

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- आगामी निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच झालेल्या दौऱ्यात अनेक आश्वासनांचे फुगे सोडले. स्थानीक स्वराज्य संस्थांची निवडणूक आगामी सहा महिन्यांत होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शहरात विविध योजना आणि घोषणांनी जोर पकडला आहे. सर्वाधिक चर्चेत आहे ते 'सोलापूरचे आयटी पार्क.' सोलापुरातील मुले पुणे, मुंबईत कामाला आहेत. त्यांच्यासाठी सोलापुरातच आयटी पार्कची निर्मिती व्हावी, अशी अनेक वर्षांपासूनची मागणी आहे.

या मागणीला हवा देण्याच काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. सोलापूरमध्ये आयटी पार्क उभे केल्यास युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. जिल्हा प्रशासनाने उत्तम जागा शोधल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून आयटी पार्क उभारण्यात येईल आणि इथे आयटी उद्योग आणण्यात येतील. शहरात उद्योगासाठी आवश्यक चांगले रस्ते आणि विमानसेवा उपलब्ध झाल्याने इथल्या औद्योगिक विकासावर भर देण्यात येईल, असे मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुम्ही चांगली जागा शोधून द्या, मी आयटी पार्क बांधून देतो, अशी घोषणा केली. त्यानंतर सोशल मीडियावर 'सोलापूरच्या आयटी पार्क'ची अनेक संकल्पचित्रे व्हायरल होत आहेत. यातील एका संकल्प चित्रामध्ये आयटी पार्कच्या इमारती हवेत उडत आहेत. खाली भेगाळलेली जमीन आहे. बाजूला मंदिरे आहेत. हे संकल्पचित्र पाहून अनेक जण आपले मत सोशल मीडियावर व्यक्तकरीत आहेत.

जिल्ह्यात नामांकित १४ अभियांत्रिकी महाविद्यालये असून त्यातून दरवर्षी पाच हजार अभियंते शिक्षण पूर्ण करतात. मनुष्यबळ, पाणी, रस्त्यांची कनेक्टिव्हिटी, राहण्याची उत्तम सोय, चिंचोळी एमआयडीसीत इमारत व अन्य एमआयडीसींमध्ये जागेची पुरेशी उपलब्धता आणि आता विमानसेवा अशा सर्व सोयी-सुविधा असतानाही स्मार्ट सोलापूरमधील तरुण-तरुणींना अद्याप आयटी पार्कची प्रतीक्षाच आहे. दूरदृष्टी असलेले प्रशासकीय अधिकारी असतानाही सोलापूरमध्ये आयटी पार्क नाही. शेजारील पुणे जिल्ह्यात आयटी पार्कची गर्दी झालेली असतानाही लोकप्रतिनिधींना आपल्या जिल्ह्यातील तरुणांचे स्थलांतर रोखण्यासाठी आतापर्यंत एकही आयटी पार्क आणता आले नाही.

सोलापुरातील हजारो तरुण-तरुणी बंगळूर, पुणे, मुंबईसह अन्य एमआयडीसींमधील आयटी पार्कमध्ये कार्यरत आहेत. निवडणुकीवेळी त्याच तरुण-तरुणांना बोलावणारे लोकप्रतिनिधी आतातरी स्थलांतर रोखून शहर-जिल्ह्याच्या प्रगतीसाठी आयटी पार्क आणतील का?, असा सवाल उपस्थित केला जात आहे. आता तरुणांचे स्थलांतर रोखण्यासाठी लोकप्रतिनिधींना यशस्वी प्रयत्न करावेच लागतील, अन्यथा प्रत्येक निवडणुकीत माता-पित्यांना सोडून परजिल्ह्यात-परराज्यात नोकरीसाठी गेलल्या त्या तरुणांच्या कुटुंबांना आयटी पार्क सोलापुरात का आले नाही? या प्रश्नाचे उत्तर द्यावे लागेल. सोलापूरच्या चिंचोळी एमआयडीसीमध्ये आयटी पार्कची इमारत धूळखात आहे. तीन वर्षांपूर्वी डोणगाव रोडवर आयटी पार्कचे भूमिपूजन झाले. या भूमिपूजनामुळे आजूबाजूच्या जागेचे भाव वाढले. डेव्हलपर्स आणि दलाल यांनी यात हात धुऊन घेतले. आता आयटी पार्कच्या जागेसाठी जागेचा शोध सुरू आहे. कुंभारी, अक्कलकोट रोड, डोणगाव, सोरेगाव यासह विविध भागांतील खुल्या जागा चर्चेत आहेत. या (पान 2 वर..)

सोलापूरमध्ये जिल्ह्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरुच

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकत्रीकरण समितीच्या वतीने पूनम गेटसमोर बेमुदत आंदोलन सुरूच आहे. समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारपासून (ता. १९) आंदोलन सुरू केले आहे.

या समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू केले आहे.

दहा वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे १०० टक्के समायोजन केले जावे, प्रत्येक वर्षी ३० टक्केप्रमाणे सेवा समाविष्ट करण्याचे धोरण ठरावे. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे, पण प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नाही. त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करावेत. त्यांना अन्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व प्रकारचे लाभ दिले जावेत. कर्मचारी संघटनांनी २०२३ मध्ये आंदोलन केले होते,

त्या आंदोलनात गुन्हे दाखल

झालेल्या कर्मचाऱ्यांवरील गुन्हे मागे घ्यावेत. आयुष, प्रधानमंत्री मातृवंदना, एचबीटी या उपक्रमांतील सर्व कर्मचाऱ्यांचे समावेशन करावे. केंद्राच्या सूचनांप्रमाणे समुदाय आरोग्य अधिकारी यांचा सेवा कालावधी सहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर कंत्राटी सेवा नियमित करण्याचा निर्णय लागू करावा. ज्या कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यासाठी पद नसेल तर आकृतिबंधात सुधारणा करून त्यांना समाविष्ट करावे. कंत्राटी आयुष अधिकाऱ्यांचे गट 'ब' वैद्यकीय अधिकारी म्हणून समावेशन करावे. अन्य कमी कालावधीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सरसकट १० टक्के वार्षिक वाढ करावी. कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण सुविधा उपलब्ध करून द्यावी. कर्मचाऱ्यांना विनंती बदलीची संधी द्यावी, आदी मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

मागील काही दिवसांपासून आंदोलन केले जात आहे, तरी शासनाने अद्याप या मागण्यांची दखल घेतली नाही. संघटनेचे राज्य समन्वयक कृष्णा माने, डॉ. रोहन वायचाळ, सुवर्णा गोडसे, सचिन क्षीरसागर, वंदना भगरे व प्रतिभा पाटील यांनी आंदोलनस्थळी ठाण मांडले आहे.

निवडणूक आयोग त्यांचं काम योग्य पद्धतीनं करत नाही - शरद पवार

मुंबई (कटूसत्य वृत्त):- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आज यशवंतराव चव्हाण सेंटर येथे केंद्रीय निवडणूक आयोगाचा भोंगळ कारभार, बोगस मतदान व मतदारांची दुबार नावं या संपूर्ण गैरप्रकारावर प्रकाश टाकणारी महत्वपूर्ण पत्रकार परिषद पार पडली.

या पत्रकार परिषदेत शिरूर-हवेली आणि हडपसर विधानसभा मतदारसंघातील मतदार यादी घोटाळ्याचा पुराव्यांसह उलगडा करण्यात आला. तसेच, राज्यातील इतरही मतदार संघांतील मतदार यादी घोटाळा प्रसार माध्यमांसमोर मांडण्यात आला आहे.आयोगाच्या माध्यमातून कशाप्रकारे मतदारसंघात मत चोरी करण्यात आली यासंदभार्तील प्रात्यक्षिक शिरूर मतदार संघातील उमेदवार अशोक बापू पवार तर हडपसर मतदार संघातील उमेदवार प्रशांत जगताप यांनी दाखवले.

यावेळी पत्रकारांशी बोलताना राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार म्हणाले की, निवडणूक आयोग स्वच्छ भूमिका घेत नाही. निवडणूक आयोग स्वतंत्र आहे. मात्र त्यांनी त्याची भूमिकाजी घ्यायला हवी होती ती घेतली नाही. निवडणूक आयोगाकडून आमची फार काही अपेक्षा नाही आहे असे शरद पवार म्हणाले.

शरद पवार म्हणाले की, राहुल गांधी यांनी हे सर्व सत्य समोर आणलं, मात्र याची सुरुवात बिहारमधून झाली. आज बिहारमध्ये राहुल गांधींचा गौरव सुरू आहे. बिहार आर्थिकदृष्या अडचणीचं राज्य आहे. त्यांचे काही प्रश्न असतील मात्र राजकियदृष्ट्या ते राज्य जागरूक आहे आणीबाणच्या काळात पहिला संघर्ष बिहारमद्ये झाला होता. राहुल गांधी यांच्या माहितीत एका झोपडपट्टीत एका घरात 140 लोकं राहत असल्याचे समोर आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून राज्यातील मतदारयाद्यांचा अभ्यास सुरू करण्यात आला आहे, असे शरद पवार यांनी बोलताना म्हटले आहे.

उपराष्ट्रपती निवडणुकीवर बोलताना शरद पवार म्हणाले की, आम्ही सगळ्यांनी मिळून दोन ते तीन नावाची चर्चा केली. त्यानंतर सर्वांचं एकमत झालं. सत्ताधाऱ्यांकडून उमेदवार जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी मला फोन केला. महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत म्हणून सहकार्य करावे ही विनंती केली. तथापि, मी शक्य नाही म्हटलं असल्याचे ते म्हणाले कारण ते वेगळ्या

विचाराचे आहेत. मुख्यमंत्र्याच्या विनंतीवर मी शक्य नसल्याचे सांगितले. राऊतांशी बोलणं झालं असून त्यांचीही चर्चा झाली. त्यांचा आणि आमचा निर्णय एकच आहे. आम्ही आमचं बघतो त्यांनी काय करायचं ते ठरवतील, निकाल वेगळा लागेल. आम्ही सरकारचा विचार करत नाही. गेल्यावेळी 300 खासदार रस्त्यावर उतरले. आम्हाला अटक करण्यात आली. असेही शरद पवार यांनी सांगितले.

जयंत पाटील यांनी बोलताना सांगितले की, मतदारयादीत एका घरात 18 नावं असून एका घरात दुसरं कोणी आहे. काही ठिकाणी घरांसमोर 0 त्या पुढे 00 असं दिसतं. जिल्हाधिकाऱ्यांना सांगूनही आता तेवढा वेळ नाही हे उत्तर दिलं जातं. ही चांगली गोष्ट आहे की फडणवीसांनी हे मान्य केलं की मतदार याद्यांमध्ये घोळ आहे. आमची अशी इच्छा आहे की, त्यांना मतदार याद्यांवर संशय असेल तर त्यांनी आमचा जो प्रयत्न सुरु आहेत, ज्यात सामील व्हायला हवं आणि निवडणूक आयोगाला वठणीवर आणण्यासाठी प्रयत्न करायला हवा असे जयंत पाटील म्हणाले.

जितेंद्र आव्हाड बोलताना म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने राज्यातील पराभूत झालेल्या मतदार संघात मतदानाची झालेली चोरी उघडकीस आणणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे स्वतः पुढाकार घेऊन ही चोरी उघडकीस आणणार आहे. प्रत्येक मतदारसंघात 10 ते 15 नावे घुसवली जात आहे. सध्या आमच्याकडे दोन मतदारसंघातील वास्तव माहिती उपलब्ध आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने राज्यात झालेले मतचोरी विरोधात जन आंदोलन उभारण्यात येईल. निवडणूक आयोगाच्या माध्यमातून महाविकास आघाडीचा पराभव कशाप्रकारे करण्यात आला याचा भांडाफोड करण्यात येईल. असे मुख्य प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी बोलताना सांगितले.

शिरूर विधानसभा मतदारसंघातील विधानसभेचे उमेदवार अशोक बापू पवार यांनी मतदार संघातील मत चोरी संदर्भात माहिती देताना म्हटले की, मतदार संघातील केसनंद या गावांमध्ये 188 मतदारांची नोंद झालेली आहे. ग्राम विकास अधिकाऱ्यांकडून या संदर्भात माहिती विचारली असता क्रमांक एक मधील मतदार इथे राहत नसल्याचे सांगण्यात आले तसेच या मतदार यादीत मृत्यू असल्याचे देखील नावे नोंद आहे. तर अनेक जणांचे मतदार यादीत पुन्हा पुन्हा नाव असल्याचे देखील अशोक बापू पवार यांनी मतदार यादी दाखवत सांगितले आहे.

यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, विधिमंडळ पक्षनेते आमदार जयंत पाटील, पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस व मुख्य प्रवक्ते जितेंद्र आव्हाड, राष्ट्रीय महिला अध्यक्षा व राज्यसभा खासदार फौज़िया खान, राज्याचे माजी मंत्री राजेश टोपे, राज्याचे माजी मंत्री व पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र विभाग प्रभारी हर्षवर्धन पाटील, खासदार निलेश लंके, माजी आमदार अशोक पवार, महिला प्रदेशाध्यक्षा अॅड. रोहिणी खडसे, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, पक्षाचे पुणे शहर जिल्हाध्यक्ष प्रशांत जगताप,सचिन दोडके व विकास लवांडे हेदेखील उपस्थित होते.

पंढरपूरवरील महापुराचे संकट टळलं; उजनी धरणातून कमी पाण्याचा विसर्ग

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पंढरपूरकरांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. पुणे परिसरातील पाऊस थांबल्याने उजनीतून सोडण्यात येणारा पाण्याचा विसर्ग हा कमी होण्यास सुरुवात झालीआहे . परिणामी पंढरपूर वरील महापुराचा धोका टळला आहे.

मात्र, असे असले तरी चंद्रभागा ही धोक्याच्या पातळीजवळ पोहोचली असून सध्या पात्रात एक लाख 90 हजार क्युसेक विसर्गाने पाणी वाहत आहे. दरम्यान, पुणे परिसरातील पाऊस कमी झाल्याने उजनी धरणातून सोडण्यात येणारा विसर्ग कमी होण्यास सुरुवात झाली आहे. आज सकाळी उजनी धरणातून एक लाख पस्तीस हजार क्युसेक विसर्गाने पाणी सोडले जात आहे. मात्र उजनीकडे येणारा विसर्ग 80 हजारपर्यंत कमी झाल्याने आज दुपारपर्यंत भीमा नदीत सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग ही कमी होणार आहे. मात्र चंद्रभागा आपल्या रौद्ररूपात वाहत असताना भाविक अत्यंत धोकादायक पद्धतीने स्नान करतानाचे धक्कादायक चित्र अनेक घाटांवर दिसत आहे. दुसरीकडे. काल (22 ऑगस्ट) सोडलेल्या पाण्यामुळे कर्नाटककडे जाणाऱ्या गोपाळपूर येथील पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने कर्नाटकची वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आलेली आहे.

राज्यात ८ लाख ५१ हजार हेक्टरवर पिकांचे नुकसान

मुंबई (कटूसत्य वृत्त):- राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये १०८ तालुक्यांतील ८ लाख ४४ हजार ३४६ हेक्टरवर नुकसान झाले आहे. २० ऑगस्ट रोजी हीच आकडेवारी ८ लाख ५१ हजार ११० हेक्टर होती. कृषी विभागाने जाहीर केलेल्या प्राथमिक अंदाजात ७ हजार हेक्टरने क्षेत्र घटले आहे.

राज्यात गुरुवारी (ता. २१) पाऊस कमी झाला असून अनेक ठिकाणचे पाणी ओसरले आहे. त्यामुळे पंचनामे होणे अपेक्षित होते, मात्र कृषी विभागांच्या जाहीर केलेल्या नुकसानीच्या प्राथमिक अंदाजात तफावत आली आहे.

राज्यात १५ ऑगस्टपासून झालेल्या जोरदार अतिवृष्टीमुळे २० जिल्ह्यांत मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीच्या अंदाजानुसार, ८ लाख ५१ हजार ११० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. नांदेडमध्ये २ लाख ८५ हजार,

५४३, बुलडाण्यात ८९ हजार ७५८, अमरावतीमध्ये २३ हजार ५८३, वाशीममध्ये १ लाख ५१ हजार ७२३, यवतमाळमध्ये ९२ हजार ७२३, अकोल्यात ४३ हजार ७०३ वर्ध्यात ७७६, सोलापुरात ४१ हजार ४७२, अहिल्यानगर येथे ३ हेक्टर, सांगलीत १९९८, धुळ्यात २३, जळगावमध्ये १२,३३७, हिंगोलीगमध्ये ४० हजार, परभणीत २० हजार २२५, छ. संभाजीनगरमध्ये २०७४, जालन्यात ५१७८, बीडमध्ये १९२५, धराशिवमध्ये २८ हजार ५०० आणि लातूरमध्ये १० हेक्टरवर नुकसान झाले आहे.

पश्चिम महाराष्ट्रात पूर, तरीही अंदाज नाही

राज्यात सर्वदूर पाऊस झाला असून नुकसान झाले आहे. मात्र कृषी विभागाच्या नुकसानीच्या अंदाजात सोलापूर, सांगली वगळता अन्य जिल्ह्यांतील नुकसानीचा प्राथमिक अंदाज अद्याप जाहीर झालेला नाही. पंचगंगा, कृष्णा या मोठ्या नद्यांसह लहान-मोठ्या नद्यांना महापूर आला आहे. उसासह भुईमूग, भात, नाचणी आणि मिरची पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.



जुन्या वाहनधारकांसाठी दिलासा !

आता १५ ऐवजी २० वर्षे चालवा गाडी

मुंबई (कटूसत्य वृत्त):- जुन्या वाहन मालकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारने १५ वर्षे जुन्या वाहनांची नोंदणी २० वर्षांपर्यंत वाढवण्यास परवानगी दिली आहे, यासाठी पुनर्नोंदणी शुल्क वाढवण्यात आले आहे.

हा नवीन नियम "केंद्रीय मोटार वाहन नियम (तिसरी सुधारणा), २०२५" अंतर्गत लागू करण्यात आला आहे, जो २० ऑगस्ट २०२५ पासून लागू झाला आहे. हा आदेश दिल्ली-एनसीआर वगळता देशभरात लागू होईल, कारण दिल्ली-एनसीआरमध्ये आधीच १५ वर्षे जुन्या पेट्रोल आणि १० वर्षे जुन्या डिझेल वाहनांवर बंदी आहे.

पुनर्नोंदणी :

१५ वर्षे जुन्या वाहनांची नोंदणी आता आणखी ५ वर्षे वाढवून २० वर्षे करता येते, जर वाहन फिटनेस चाचणी उत्तीर्ण झाले असेल. हे नूतनीकरण दर ५ वर्षांनी करावे लागते आणि यासाठी मान्यताप्राप्त ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन (ATS) कडून फिटनेस प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

पुनर्नोंदणी शुल्कात मोठी वाढ

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने नोंदणी नूतनीकरणासाठी नवीन शुल्क निश्चित केले आहे, जे पूर्वीपेक्षा खूपच जास्त आहे. हे शुल्क जीएसटी वगळून आहे

- मोटारसायकल: २,००० रुपये (पूर्वी ३०० रुपये)
- तीनचाकी सायकल: ५,०००
- हलके मोटार वाहन (एलएमव्ही, जसे की कार): १०,००० रुपये (पूर्वी ६००)
- आयात केलेली दुचाकी: २०,०००
- आयात केलेले चारचाकी: ८०,०००
- वाहनांच्या इतर श्रेणी: १२,०००
- व्यावसायिक वाहन: टॅक्सी: ७,००० (पूर्वी १,०००)
- बस/ट्रक: १२,५०० (पूर्वी १,५००)

संपादकीय

स्वदेशी उद्योग आणि आत्मनिर्भरता

आपल्या देशात गणपतीची मूर्तीदेखील परदेशातून येते. होळीचे रंग आणि पिचकारीदेखील चीनमधून येते. त्यामुळे आपण स्वदेशीचा वापर वाढवावा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले आहे. जेव्हा आपण स्वदेशी उत्पादने निवडतो, तेव्हा आपण कारागिरांना आणि हस्तकला उद्योगांना सक्षम बनवतो व उपजीविकेच्या संधी निर्माण करतो. त्याचप्रमाणे देशाची अर्थव्यवस्था मजबूत करतो, असे उद्गार नुकतेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काढले आहेत. 24 जानेवारी 2018 रोजी उत्तर प्रदेशात 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' (ओडीओपी) हा कार्यक्रम 75 जिल्ह्यांमध्ये राबवण्यास प्रारंभ करण्यात आला. लखनौमधील चिकनकारी, मुरादाबादमधील पितळेची भांडी, सहारनपूर येथील लाकडी हस्तकला, चित्रकूटची लाकडी खेळणी, फिरोदाबादच्या काचेच्या बांगड्या व दिवे, वाराणसीतील बनारसी सिल्क साड्या, बदायूँमधील जरीकाम अशा अनेक उद्योगांना तेथे प्रोत्साहन दिले जात आहे.

मथुरेचा पेढा, बलियाचा सत्तू, बिजनोरचा सेंद्रीय गूळ, आझमगडची काळ्या मातीची भांडी, गोरखपुरातील टेराकोटाची मातीच्या कलावस्तू अशा अनेक उद्योगांसाठी कौशल्यप्रशिक्षण, सामान्य सुविधा केंद्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. जागतिक व्यापार प्रदर्शने आणि ई-कॉमर्सचा फायदा घेत, उत्तर प्रदेशने ओडीओपीशी संबंधित निर्यात गतवर्षी 1 लाख 86 हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवली. स्वदेश गिफ्ट हँपर योजनादेखील राबवण्यात आली असून, ते स्वदेशीच्या संकल्पनेशी सुसंगतच आहे.

दुसरीकडे, भारतातील पहिली देशांतर्गतरीत्या उत्पादित सेमीकंडक्टर चिप यंदा बाजारात आणली जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना जाहीर केले आहे. देशांतर्गत उत्पादनाद्वारे भारताचे वाढते परावलंबित्व कमी करणे, हा यामागील उद्देश आहे. जागतिक आर्थिक अनिश्चितता असल्याने जनतेने स्वदेशी भावना स्वीकारावी आणि स्थानिक पातळीवर तयार झालेल्या उत्पादनांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात येत असून, त्याचे देशवासीय स्वागतच करतील. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताची अर्थव्यवस्था मृतवत असल्याचा उल्लेख केला होता. खरे तर, भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करत आहे. अशावेळी भारतीय अर्थव्यवस्थेबाबत अनुदार उद्गार काढणे, हे संतापजनकच होते. अशावेळी देशाची खरी सेवा ही स्वदेशी वस्तूंना प्रोत्साहन देण्यात आहे. स्वदेशीचा उद्देश केवळ विदेशी कपड्यांच्या बहिष्कारापुरता मर्यादित नव्हता, तर आपल्या आर्थिक स्वातंत्र्याला मिळालेले ते एकप्रकारचे बळ होते. मुख्यत्वे भारताच्या लोकांना आपल्या विणकरांसोबत जोडण्याची ती एक मोहीम होती, याकडे त्यांनी लक्ष वेधले होते.

मागील दहा वर्षांत देशांतर्गत खादीच्या उत्पादनात तिपटीपेक्षा अधिक वाढ झाली असून, खादी कपड्यांच्या विक्रीत पाचपट वाढ झाली आहे. केंद्र सरकारने 'व्होकल फॉर लोकल'चा मंत्र दिला. आमच्याकडे गणपतीची मूर्तीदेखील परदेशातून येते आणि तीदेखील छोटी आँखवाली! होळीचे रंग आणि पिचकारीदेखील चीनसारख्या देशातून येते, याकडे लक्ष वेधत, पंतप्रधानांनी विदेशी वस्तू वापरू नका. देशातील वस्तूच खरेदी करा, असे आवाहन याआधीही केले आहे. स्वदेशी उपक्रमाचाच एक भाग म्हणजे 'मेक इन इंडिया' ही योजना. 2014 मध्ये संपूर्ण देशात मोबाइलची निर्मिती करणारे केवळ दोन कारखाने होते. आज हा आकडा दोनशेहून अधिक झाला आहे. भारताची मोबाइल निर्यात 1 हजार 556 कोटींवरून 1 लाख 20 हजार कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोहोचली आहे. आज भारतात वापरले जाणारे लाखो मोबाइल फोन 'मेक इन इंडिया'मधूनच तयार झालेले आहेत. जागतिक स्तरावर भारत दुर्सया क्रमांकाचा सर्वात मोठा मोबाइल उत्पादक बनला आहे. आता आपण पूर्णतः प्रक्रिया केलेल्या पोलादाचे निर्यातदार बनलो आहोत. 2014 पासून पोलादाच्या उत्पादनात 50 टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. गेल्यावर्षीच सेमीकंडक्टरची निर्मिती करर्णाया तीन प्रकल्पांचा शुभारंभ झाला. त्यापैकी दोन प्रकल्प गुजरातमध्ये, तर एक आसाममध्ये आहे. यातले दोन प्रकल्प हे टाटा, तर तिसरा मुरुगन कंपनीचा आहे. सेमीकंडक्टर उत्पादनात भारत प्रवेश करत असून, त्यात 1500 कोटी डॉलर्सची गुंतवणूक केली जाणार आहे. हे प्रकल्प जेव्हा कार्यान्वित होतील, तेव्हा पाच लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. आजचे युग हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे त्याचप्रमाणे तंत्रज्ञानाचे आहे. मोबाइल, कॉम्प्युटर, लॅपटॉप, कृत्रिम बुद्धिमत्ता, बँकिंग, संरक्षण, वाहननिर्मिती, वैद्यकीय या सर्व क्षेत्रांमध्ये सेमीकंडक्टर, म्हणजेच मायक्रो चिपचा वापर केला जातो. गेल्यावर्षी आयफोन-6 आला, तेव्हा त्यातल्या छोट्या मायक्रोचिपमध्ये कॉम्प्युटरमधील बर्याच गोष्टी सामावलेल्या होत्या.

जपान, अमेरिका, चीन, तैवान यांनी या क्षेत्रात उतुंग झेप घेऊन आपले वर्चस्व वाढवले आहे. आज जगातील 70 ते 80 टक्के मायक्रो चिप्स तैवानमध्ये तयार होतात. अमेरिकेने डोनाल्ड ट्रम्प यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या पहिल्या कारकिर्दीच्या वेळी चीनशी व्यापारयुद्ध छेडले होते. राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा पुढे करून, 5-जी स्मार्टफोन आणि चिप तंत्रज्ञान क्षेत्रातील 'हुआवे' या चिनी कंपनीवर निर्बंध घातले.एवढेच नव्हे, तर 2019 पासून उच्च तंत्रज्ञान क्षेत्रातील चिनी कंपन्यांना आपला माल अमेरिकेस पाठवण्यावर नियंत्रणे आणली. झेडटीई, हुआवे या दूरसंचार क्षेत्रातील चिनी कंपन्यांवरही करवाई सुरू केली. दोन वर्षांपूर्वी अमेरिकेने एनव्हिडिया तसेच एएमडी या कंपन्यांना चीनमधल्या आस्थापनांना एआय मॉडेलिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या जीपीयू चिप विकायलाही त्यांनी बंदी घातली.

एवढेच नव्हे, तर अमेरिकेने आपल्या जवळच्या देशांनाही अशाप्रकारचे निर्बंध चीनवर लावण्यास उद्युक्त केले. अशीच परिस्थिती भारतावर उद्भवल्यास, त्यास तोंड देता यावे, म्हणून स्वदेशी उद्योगांना बळ देणे योग्य ठरेल. भारताची ग्राहक बाजारपेठ मोठी असल्यामुळे आपली अर्थव्यवस्था केवळ नियार्तीवर अवलंबून नाही. अर्थात, देशी उद्योगांना प्रोत्साहन देतानाच, त्यांना केवळ सबसिड्यांवर जिवंत ठेवणे दीर्घकाळात हानीकारकच ठरेल.

पान १ वरून

मुख्यमंत्री फडणवीसांकडून...

चर्चेमुळे जागेच्या व्यवहारात काही जण मलाई खातील हे स्पष्ट आहे. हल्ली सोलापूरात माजी नगरसेवक, माजी आमदार, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते बांधकाम व्यवसायात उतरले असल्याने यात कोणाची चांदी होणार हे ही स्पष्ट आहे. प्रश्न आहे तो सर्वसामान्य सोलापूरातील युवकांना रोजगाराची गाजर अजून कीती वर्ष दाखवणार? पुण्यातील हींजवडीचे आयटी पार्क आता हळूहळू रिकामे होत आहे.या कंपन्यांना सोलापूर का दाखवले जात नाही? पुण्यापासून रेल्वेने चार तासांवर असलेले शहर आयटीपार्कसाठी योग्य आहे हे का सांगीतले जात नाही? कीती दीवस सोलापूरकरांना आश्वासनाची गाजरे आणी फुगे दाखवून तुम्ही फसवणार आहात याचे उत्तर सत्ताधाऱ्यांना जनता विचारते आहे.

जेव्हा मुलं आपली चप्पल घालू लागतात...

अठरा वषार्नंतर मुलं प्रौढ होतात. चांगलं-वाईट, खरं-खोटं आणि बऱ्यापैकी दुनियादारी त्यांना समजू लागते. स्वतःच्या भविष्याबाबत मुलं जागरूक झालेली असतात. पोरकटपणा जाऊन पोक्त विचार करण्याची उंची त्यांनी गाठलेली असते. अशा काळात मुलं शारीरिक दृष्ट्या आपल्या बापाइतकी बलदंड झालेली असतात, तर मुली देखील आपल्या आईइतक्या समजदार बनलेल्या असतात.

ज्यांना आपण आपल्या अंगावर, खांद्यावर खेळवलं, तीच मुलं आता आकाशाला गवसणी घालायला तयार झालेली असतात. त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी वेळ प्रत्येक आई-वडिलांनी काढलाच पाहिजे. जेव्हा मुलं आपली चप्पल घालू लागतात, त्यावेळी खरंतर आपल्याला नवे मित्रच मिळालेले असतात. शारीरिक वाढीसोबत त्यांच्यात आलेल्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक प्रगल्भतेची आपण या काळात कदर केली पाहिजे.

"बाप से बेटा सवाई" अशी एक म्हण आहे. त्यानुसार आपली मुलं आपल्यापेक्षा वरचढ असतात; हे आपण मान्य केलं पाहिजे. त्यांचा वरचढपणा आता स्पष्ट दिसू लागतो. आजच्या काळात आपल्यापेक्षा त्यांना स्थैर्य मिळवण्यासाठी जास्त कष्ट घ्यावे लागणार आहेत. स्वतःला सतत अपडेट करत राहावं लागणार आहे. तोल जाण्याचे आणि प्रलोभनांचे क्षण त्यांच्यासमोर अनेक वेळा येणार आहेत.अशा वेळी उपदेशाचे डोस त्यांना सतत पाजून कंटाळून सोडण्यापेक्षा, आपले स्वतःचे अनुभव सांगणे अधिक सोयीचे ठरेल. आपण केलेला संघर्ष, लागलेल्या ठेचा, झालेल्या चुका, भेटलेली माणसं, सहन केलेला अपमान, मिळालेला सन्मान, करायच्या राहून गेलेल्या गोष्टी... असं स्वतःबद्दल सांगून आपण त्यांच्याशी मित्रत्वाचे नवे संबंध जुळवू शकतो.

मुलांकडूनही त्यांच्या विश्वातील नव्या काळाच्या आणि पिढीच्या गोष्टी समजून घेता येतात. तंत्रज्ञानाबाबत होणारे बदल त्यांच्याकडून जाणून घेता येतात. जगामध्ये घडणाऱ्या नव्या घटनांवर त्यांची मतं ऐकता येतात. त्यांचे भविष्याचे नियोजन, ध्येयं आणि स्वप्नं आपल्याला समजू शकतात.आपली मुलं ही आता फक्त आपली राहिली नाहीत, हे आपल्याला ध्यानात घ्यायला हवं. अठरा वर्षांनंतर आपल्या देशात मतदानाचा हक्क मिळतो, म्हणजेच ही मुलं आता समाजाची, देशाचीच नव्हे तर ग्लोबलायझेशनच्या युगात जगाची नागरिक बनलेली असतात. त्यांच्या मनामध्ये समाजाबद्दल उत्तरदायित्वाची भावना कशी निर्माण होईल, याकडे लक्ष दिलं पाहिजे. मुलांकडून पराकोटीच्या अपेक्षा करण्यापेक्षा किंवा अपेक्षांचं ओझं त्यांच्या डोक्यावर टाकण्यापेक्षा चर्चेतून त्यांचा कल ओळखला पाहिजे.

'हेलिकॉप्टर पालकत्व' म्हणजे मुलांच्या डोक्यावर हेलिकॉप्टरसारखं फिरत राहणं होय—त्यांच्या सुरक्षेसाठी आणि यशासाठी सतत काळजी वाहणे होय. परंतु आता मुलांना स्वतंत्र करण्याची सुरुवात झाली पाहिजे. स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यासाठी आणि करिअरच्या निवडीबाबत त्यांना मोकळीक द्यायला हवी.'वाघाचं पालकत्व 'म्हणजे मुलांना नेहमी धाकात ठेवणे. मुलांनी त्यांच्या क्षेत्रात सर्वात पुढे राहिलंच पाहिजे किंवा सर्वाधिक गुण मिळवलेच पाहिजेत म्हणून कठोरपणे वागणे. अशा प्रकारच्या पालकत्वातून मुलांमध्ये तणाव वाढतो आणि आत्महत्येसारख्या घटना घडतात.

या वयात मुलं कॅम्पस लाईफसाठी तयार होतात. यासाठी त्यांना पूर्णपणे तयार होण्यासाठी वेळ लागतो. रोजच्या दिनचर्येमध्ये बदल करावे लागतात. महिन्याभराचं स्वतःचं बजेट तयार करावं लागतं. स्वतःची कपडे धुवावी लागतात. मेसमधील जेवण त्यांना आवडत नाही, त्यामुळे बाहेरच्या चटपटीत खाण्याचा मोह होऊ शकतो. त्यासाठी त्यांना मानसिक व भावनिकरीत्या तयार करावं लागतं.या वयात प्रयोग करण्याची मुलांची उत्सुकता वाढलेली असते. जीवनातील वेगवेगळे अनुभव घेण्याविषयी त्यांच्यात ओढ निर्माण झालेली असते. तेव्हा चांगल्या-वाईट गोष्टींबाबत पुसटशी कल्पना आपण द्यायला हवी, परंतु त्याचा अतिरेक होणार नाही याची दक्षताही घ्यावी.

शेवटी, आपण मुलांसोबत कायम असणार आहोत, ही खात्री आणि विश्वास आपण देऊ शकलो, तर त्यांच्या प्रौढ होण्याला खरा अर्थ देता येईल.

- किशोर जाधव, सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

मध्यवर्ती गणेश मंडळांचा डिजेमुक्तीचा निर्धार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या उपस्थितीमध्ये गणेशोत्सव २०२५ चे अनुषंगाने सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दि. २१/०८/२०२५ रोजी १६.०० वा. पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी, शांतता समिती सदस्य, सोलापूर महानगरपालिकेकडील अधिकारी, धमार्दाययुक्त कार्यालयाकडील अधिकारी, गणेशोत्सव मध्यवर्ती व सार्वजनिक जयंती उत्सवाचे पदाधिकारी, सदस्य, यांची पोलीस आयुक्त कार्यालय येथे संयुक्तपणे बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीची प्रस्तावना हों अश्विनी पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) यांनी करुन बैठक आयोजन करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला.

दि.२७/०८/२०२५ रोजी ते दि. ०६/०९/२०२५ रोजी पर्यंतचे कालावधीत गणेशोत्सव २०२५ साजरा करण्यात येणार आहे. वि. ०६/०९/२०२५ रोजी मिरवणुकीमध्ये पारंपारीक वाद्य वाजविणेबाबत सुचना देण्यात आल्या. गणेशोत्सवा करीता वर्गणी/देणीगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार कराय जबरदस्तीने वर्गणी मागू नये. सर्व मंडळांनी आपल्या मंडळाची रितसर धमार्दाय आयुक्त यांचेकडे नोंदणी करावी. उत्सव काळात सर्व मंडळानी सीसीटीव्ही कॅमेरेंची व्यवस्था करावी, मंडपासाठी सार्वजनिक रस्त्याचा २/३ भाग मोकळा सोडावा.

मोकाट जनावरांपासुन मुतीर्ला घोका होणार नाही याची खबरदारी घ्यावी. देखावे चित्र आक्षेपार्ह नसावेत, उत्सवाचे पावित्र्य राखाये, मंडळांकडुन जाहिरात प्रदर्शन करण्यात येत असल्यास आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंदी द्यावी. तसेच स्वच्छता, जलसंवर्धन, वृक्षारोपण, साक्षरता, सायबर गुन्हेगारी यंत्रणाबाबत जनजागृती करावी. देखावे, रोषणाई पाहण्यास येणाऱ्या महिला व पुरुष भाविकांकरीता स्वतंत्र रांगेची सोय करावी प्रवेशाकरीता आणि बाहेर जाण्यास स्वतंत्र गेट असावेत. सांस्कृतिक कार्यक्रमांसोबत आरोग्य विषयक उपक्रम/शिबीरे

आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे. सोलापूर शहर हे डीजे मुक्त होण्याबाबत सर्व मंडळाबरोबर चर्चा करण्यात आली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाचे ध्वनीप्रदुषण अनुषंगाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे. मंडाळांनी महावितरण विभागाकडुन अधिकृत विद्युत जोडणी करुन घ्यावी जेणेकरुन मंडपामध्ये शॉर्टसर्कीट होवून इजा अथवा धोका होणार नाही याची दक्षता घ्यावी. सर्व मंडळांनी मिरवणुकीत सामिल होणाऱ्या वाहनांची आर टी ओ कडुन तपासणी करावी. मिरवणुकीमध्ये मोठे व लांब कंटेनर वापरु नये, वाहनांवरील देखाव्यांची उंची अडथळा होणारी नसावी. मिरवणुक संवेदनशिल ठिकाणी जास्त वेळ रेंगाळत ठेवू नये. मिरवणुकीच्या वेळी ट्रिपलशिट फिरू नये, वाहनांचे सायलेंन्सर च्या पुंगळ्या काढून वाहने चालवू नये व हुल्लडबाजी करू नये. मिरवणुक मार्गात बदल करू नये. इतर धर्माच्या भावना दुखावणार नाही यांची काटेकोर दक्षता घ्यावी मंडळाने स्थापन केलेल्या गणेश मुर्तीसमोर स्वयंसेवक सतत हजर राहतील व मुतीर्ची देखभाल करतील याची पुरेपुर काळजी घ्यावी.

सोशल मिडीयावरुन काही अक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, पोस्ट व्हायरल होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत त्वरीत पोलीस यंत्रणेस कळवावे. गणेशोत्सव-२०२५ मंडळानी ऑनलाईन, ऑफलाईन पध्दतीने परवानगी घेणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी, ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणीकरीता प्रत्येक पोलीस ठाणे येथे स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. पोलीसांनी दिलेल्या सुचनांचे पालन करावे,

त्यानंतर बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी समस्या/सुचना मांडल्या. त्या नंतर सदर सुचनेचे संबंधित महानगरपालिका, महावितरण, आर टी ओ, धर्मादाय आयुक्तकार्यालय अशा खात्याचे अधिकारी यांनी सदर कामाची रुपरेषा बघुन समस्या सोडविण्यात येतील असे सांगितले.

पोलीस आयुक्त सो यांनी बैठकीस उपस्थित लोकांचे स्वागत करुन मांडलेल्या अडी-अडचणीचे निरसण केले. उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा, शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परीसरातील बेकायेदशीर बाबींची माहिती पोलीसांना दिली पाहिजे. मिरवणुकीमध्ये अफवा पसरवू नये, नियमांचे पालन करावे, नियमांचे पालन नाही झाले तर कायदेशीर कारवाई होईल. शासनाने नेमून दिलेल्या सुचना पाळल्या पाहिजेत. तसेच योग्य तो बंदोबस्त नेमू असे सांगून गणेश उत्सवानिमित्त शुभेच्छा देवून बैठकीला उपस्थितांचे आभार मानले.

सदर बैठकीस, पोलीस आयुक्त एम राजकुमार, गौहर हसन, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), श्रीमती डॉ. अश्विनी पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), विजय कबाडे, पोलीस उप आयुक्त (परीमंडळ), पोमण सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-१, खिरडकर, विभाग-२, राजन माने, गुन्हे शाखा खिरडकर, वाहतुक शाखा, तसेच जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूरकडील श्रीमती एस. जी. आकुलवार सोलापूर महानगर पालिकेकडील अभियंता गोपाल मच्छिद्र, एम. एम. आरोडा, पीडब्ल्यूडी ऑफिस, मोरे महावितरण अति. कार्यकारी अभियंता ए.एन. शेख चॅरेटी कमिशन ऑफ सोलापूर, सोलापूर अग्नीशामक दलाचे रावसाहेब ना सलगर डॉ ऋषीकेश डेरे, सिव्हील हॉस्पीटल सोलापूर, आर.टी.ओ.चे मुख्य अधिकारी पाटील तसेच सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार, व शांतता कमिटीचे सदस्य व पत्रकार बंधु उपस्थित होते.

प्रबोधन

संस्कृतीच्या नावे । सैतानांचे चाळे

संस्कृती या शब्दाचा रात्रंदिवस जप करणाऱ्या संस्कृतीनिष्ठ बहाद्दरांना संस्कृती म्हणजे काय, असा प्रश्न विचारला, तर ते पटकन उत्तर देऊ शकणार नाहीत. कारण संस्कृतीच्या व्याख्या अनेक विचारवंतांनी केल्या आहेत आणि त्या खूप वेगवेगळ्या आहेत. एक विचारवंत म्हणतो, 'संस्कृती म्हणजे विचारप्रणाली!' डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'कृतज्ञता म्हणजे संस्कृती.' त्यांनी केलेली आणखी एक व्याख्या म्हणते, 'जीवनाला जे उजाळा देतं, समृद्ध करतं, पुढे नेतं ती सर्व संस्कृतीच असते.' प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'जी वाट्याला येते ती प्रकृती, जी घडवली जाते ती संस्कृती!' पंडित नेहरू म्हणतात, ह्यसंस्कृती म्हणजे आपल्या मनावर ताबा आणि दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव.' पाश्चात्त्य तत्त्वज्ञ मॅथ्यू आर्नाल्ड म्हणतात, 'जगातील थोरांचा उपदेश आणि त्यांच्या विचारांचं ज्ञान म्हणजेच संस्कृती.' एकूण सर्व सद्गुण, सर्व चांगल्या गोष्टी ही संस्कृतीच असते. दया, प्रेम, निःस्वार्थीपणा, क्षमाशीलता, सहनशीलता, चिंतन-मनन-प्रेम, सत्य- शिव-सुंदरविषयक आस्था, कृतज्ञता, परोपकारिता, कलाप्रेम, ज्ञानपिपासा, विज्ञाननिष्ठा, शुचिता, साधेपणा, उच्चविचार, निष्कपटपणा, वात्सल्य, मार्दव ही गुणसंपत्ती संस्कृतीच असते.

भारतीय संस्कृतीविषयी आजपर्यंत तरी चांगलं बोललं गेलं. कुणी म्हणाले, 'भारताने जी संस्कृती निर्माण केली तिला जगात तोड नाही!' तर मानवतावादी साने गुरुजी म्हणाले, 'भारतीय संस्कृतीवर प्रेम करण्यात मी कुणाला हार जाणार नाही.' पण काळ बदलला, शिक्षण मुक्त झालं आणि समाजाच्या त्रस्त, पीडित, दलित, बहिष्कृत वर्गांतून आलेल्या विचारवंतांनी भारतीय संस्कृतीचं खरं, दुटप्पी, ढोंगी, विकृत स्वरूप स्पष्ट करण्यास प्रारंभ केला. श्रुती-स्मृती-शास्त्रं म्हणजे भारतीय संस्कृती, असं म्हणणाऱ्यांना आद्य समाजप्रबोधनकार लोकहितवादी देशमुख बजावतात, 'शास्त्रार्थ लोकहिताविरुद्ध असेल, तर तो बाजूला ठेवा. साक्षात ब्रह्मदेव विरुद्ध असला, तरी डगमगू नका.' स्त्रियांना-शूद्रांना शिक्षणाची बंदी करणारी संस्कृती मोडण्यासाठी जोतिराव फुलेंनी स्त्रीशिक्षणाची, शूद्रांच्या शिक्षणाची मोहीम हाती घेतली. तर उच्चवणीर्यांच्या स्वाथार्चं रक्षण करणारी मनुस्मृती डॉ. आंबेडकरांनी सार्वजनिक स्थानी जाळून भेदनीतीवर आधारलेल्या भारतीय संस्कृतीलाच आग लावली. ज्या धर्माने पक्षपाती संस्कृतीला जन्म दिला आणि आपल्याच धर्म-देशबांधवांना अमानुष यातना भोगायला लावल्या त्या धर्माचाही त्याग त्यांनी विचारपूर्वक केला.

मनुस्मृती हे ज्या संस्कृतीचं मुख आहे, तिने शूद्रांच्या द्वेषाचं विष किती ओकावं याला काही सुमारच नव्हता. मनुस्मृती म्हणते, 'यज्ञाची अंगे अपूर्ण राहिल्यास व ती वैश्यापासून न मिळाल्यास शूद्राच्या गृहातून बलात्काराने किंवा चोरी करून निःशंकपणे आणावी.' तसंच दुसऱ्या एका ठिकाणी 'शूद्र हा ब्राह्मणाच्या दास्याकरिता निर्माण केला आहे. दासाच्या स्वामीने जरी आपल्या दास्यातून मुक्त केलं, तरी ब्राह्मणाच्या दास्यातून तो मुक्त होत नाही.' आपलीच पिल्लं सर्पिण खाते, असं म्हणतात. भारतीय संस्कृती ही अशीच एक दुष्ट सर्पिण होती, हे सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट आहे. जगात ह्या संस्कृतीला तोड नाही, हे वरील वचन ह्या अर्थाने खरंच आहे.

साने गुरुजी भावविवश झाल्यावर, 'मी भारतीय संस्कृतीचा भक्त आहे,' असं म्हणाले होते. पण विचाराधीन झाल्यावर मात्र भारतीय संस्कृतीचे टीकाकार होऊन म्हणतात, 'आज भारतीय संस्कृतीच्या नावाखाली गप्पा मारणारे लोक विषमता मख्खपणे पाहात आहेत. त्यांना त्याचं दुःख नाही. श्रमहीन श्रीमंत कितीजणांना रडवत आहेत, इकडे त्यांचं लक्ष नाही. भारतीय संस्कृतीचा हे लोक वध करीत आहेत. भारतीय संस्कृतीचा आत्मा साम्यवादीच ओळखू शकेल.' साने गुरुजींनी केलेली लोकसमीक्षा ही संस्कृती समीक्षाच आहे! म्हणूनच-

संस्कृतीच्या नावे। सैतानांचे चाळे
आवळती गळे। स्वकियांचे ॥ १
संस्कृती ही नव्हे । नीच ही सर्पिण
पिल्लांना खाऊन । करी फस्त ॥ २
शिका नि शहाणे व्हा। जोतिबा सांगतात
मर्म घ्या ध्यानात। सुजाणांनो ॥ ३
धर्म, रुढी यांचे जोखड फेकावे
लोक मुक्त व्हावे । त्यांना वाटे ॥४
देवाधर्मामध्ये। लोका गुंतवून
संस्कृतीरक्षक करी चैन। अद्यापही ॥५
प्रसारमाध्यमे । ठेवूनिया हाती
सनातनी नाचताती। दुर्दैव हे ॥६

प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

चंद्रभागेला महापूर; आ.समाधान आवताडे यांनी केली पूरस्थितीची पाहणी

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- उजनी आणि वीर धरणातून भीमा नदीला सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे पंढरपुरात चंद्रभागेला महापूर आला आहे.

पावणे दोन लाख क्युसेक्स वेगाने विसर्ग सुरू असल्याने गुरुवारी पंढरपूर परिसरातील नदीकाठच्या सखल भागात पाणी शिरण्यास सुरुवात झाली आहे.

गुरुवारी चंद्रभागा नदीला निर्माण झालेल्या पूर परिस्थितीची पाहणी आमदार समाधान आवताडे यांनी केली. यावेळी त्यांनी नदीकाठच्या असलेल्या व्यास नारायण आणि अंबिका नगर झोपडपट्टीतील महापुरामुळे उपजिल्हा रुग्णालयासमोरील भक्ती निवास येथे स्थलांतरित करण्यात आलेल्या ३०० हून अधिक कुटुंबातील नागरिकांची भेट घेऊन स्थलांतरित कुटुंबांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देऊन पूर परिस्थितीचे नियंत्रण करण्यासाठी प्रशासनाला सज्ज राहण्याचे निर्देश दिले. यावेळी तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह विविध विभागाचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

काही दिवसांपासून धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस होत असल्याने उजनी धरण क्षेत्रावरील सर्व धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत.

पूर नियंत्रणासाठी पुणे व सातारा जिल्ह्यातील धरणा मधील अतिरिक्त पाणी भीमा नदीत सोडण्यात येत आहे. उजनी धरणातून आणि वीर धरणातून सोडलेले पाणी पंढरपुरात दाखल होत असल्याने गुरुवारी चंद्रभागा दुथडी भरून वाहत असून नदीला महापूर आला आहे. यामुळे पुरातन विष्णुपद मंदिरासह नदीच्या पात्रातील सर्व संतांची मंदिरे तसेच गोपाळपूर येथील पूल पाण्याखाली गेला आहे.

खबरदारी म्हणून प्रशासनाकडून नदीकाठीच्या व्यास नारायण आणि अंबिका नगर झोपडपट्टी परिसरातील ३०० हून अधिक कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे.

गुरुवारी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधाना आवताडे यांनी पंढरपुरातील पूर परिस्थितीची पाहणी करून पूररेषेतील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याच्या तसेच स्थलांतरण केलेल्या कुटुंबांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाला सज्ज राहण्याच्या सूचना केल्या.

करचुकवेगिरी प्रकरणात दोन जणांना अटक ३० कोटी ५२ लाख रुपयांची फसवणूक

मुंबई, (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र जीएसटी विभागाने देवरा एक्झिम एलएलपी या फर्मचे भागीदार मेहुल जैन व ऑपरेटर कमलेश जैन यांना ३० कोटी ५२ लाख रुपयांच्या करचुकवेगिरी प्रकरणात अटक केली. आरोपींनी चुकीची इनपुट टॅक्स क्रेडिट वजावट घेतल्यामुळे शासनाची महसूल हानी झाली. न्यायालयाने त्यांना ४ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.

कारवाईदरम्यान व्यापाऱ्याने चुकीची इनपुट टॅक्स क्रेडिट वजावट केल्यामुळे शासनाची महसूल हानी झाल्याचे आढळून आले. राज्यकर सहआयुक्त संजय पवार आणि उपायुक्त स्वप्नाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सतीश पाटील, शरदचंद्र पोहनकर, भूपेन्द्र वळवी, मनोहर कनकदंडे यांनी ही कारवाई केली.

संबंधित आरोपी करदात्याची कृती महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायदा, २०१७ व संबंधित नियमांचे सरळ उल्लंघन आहे. अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी, मुंबई यांनी आरोपींना ०४ सप्टेंबर २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभाग आधुनिक नेटवर्क विश्लेषण साधनांचा वापर करून व इतर शासकीय विभागांशी समन्वय साधून कर चुकवेगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर सतत लक्ष ठेवत आहे.

वात्रटिका

देवा...भेटीतील राज

पन्नास मिनिटांच्या भेटीत
केवळ रस्ता मागितला...
खरं तर पुढील प्रवासासाठी
इंजिनाला रूळ रस्ता केला...
ब्रँड आणि ठसा चालणार
हा विश्वास राहिला नाही...
बेस्ट वाटला होता पेपर
तेवढा सोपा निघाला नाही...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग ह

एकाचवेळी पाच शेतकऱ्यांच्या ६० हजार रुपये किमतीचे साहित्य चोरीला

चिखली (कटूसत्य वृत्त):- एकाचवेळी पाच शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींची तांब्याची तार असलेली केबल, बोअरवेलमधील मोटर व इतर साहित्य मिळून एकूण ६० हजार रुपये किमतीचे साहित्य चोरीला गेल्याची घटना बुधवार दि. २० रोजी सकाळी ९ वाजता मोहोळ तालुक्यातील देवडी येथे उघडकीस आली आहे. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर हे साहित्य चोरीला गेल्याने मोटारी बंद पडल्या असून, शेतकरी हवालदील झाले आहेत. याबाबत तानाजी मुरलीधर थोरात (रा. देवडी, ता. मोहोळ) यांनी दिलेल्या फियार्दीवरून मोहोळ पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तानाजी मुरलीधर थोरात (रा. देवडी, ता. मोहोळ) यांनी त्यांच्या विहिरीवर विद्युत मोटार बसविली होती. ते नेहमी प्रमाणे सकाळी वीजपंप चालू करण्यासाठी गेले असता त्यांना वीज पंपाच्या लाईट कनेक्शन पेटीचा दरवाजा उघडा असल्याचे दिसून आले जवळ जाऊन बघितले असता कनेक्शन पेटीच्या दरवाजा पासून विजेच्या मोटारीना गेलेल्या तांब्याच्या तारांच्या केबला कुण्यातरी अज्ञात व्यक्तीने कट करून चोरी करून गेल्याचे निदर्शनास आले. आजूबाजूच्या शेतकऱ्यांना विचारले असता त्यांच्या देखील विजेच्या व इतर साहित्याची चोरी झाल्याचे समजले तात्काळ त्यांनी याबाबत पोलिसांकडे धाव घेऊन फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली असता, त्यांना देवडी गावातील महेश दगडू अभिवंत, परमेश्वर दामू अभिवंत, महेश आबा थोरात, तात्या मधुकर पाटेकर, या शेतकऱ्यांनी त्यांच्या विहिरीवर लावलेल्या वीजपंपाच्या मोटारींना लावण्यात आलेल्या तांब्याची तार असलेल्या केबला, व इतर साहित्य चोरीला गेल्याने उघडकीस आले. या धाडसी चोरीत, पाच शेतकऱ्यांच्या वीज पंपाच्या साहित्याचे नुकसान झाले असून यामध्ये, तब्बल ९८० फूट केबल व इतर साहित्य असे मिळून साठ हजार रुपये किंमतीच्या शेती उपयोगी साहित्याची चोरी झाल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. शेतातील विद्युत मोटारी, वायर आदी शेतकरी उपयोगी साहित्य चोरीच्या घटनांमुळे देवडी परिसरातील शेतकऱ्यांसमोर नवं संकट उभे राहिले असून शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिस प्रशासनाने चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी आता देवडी गावातील शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

सैनिकी मुलींचे वसतिगृह सोलापूर येथे अशासकीय पदांची भरती

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर यांचे अधिपत्ये खालील सैनिकी मुलींचे वसतिगृह सोलापूर येथे अशासकीय सहायक वसतिगृह अधिक्षकाचे 01 पद भरावयाचे आहे. मानधन रू. 24, 875 प्रतिमहा असेल. उमेदवार हा युध्द विधवा किंवा माजी सैनिकाच विधवा पत्नी असावी. उमेदवारास मराठी व इंग्रजी टंकलेखन व संगणक हाताळण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

तरी सोलापूर जिल्ह्यातील युध्द विधवा व माजी सैनिक विधवा पत्नींनी आपले अर्ज सैनिक सेवेची इतर शैक्षणिक कागदपत्रे दि. 03 सप्टेंबर 2025 पूर्वी या कार्यालयात जमा करावी त्यानुसार दि.03 सप्टेंबर 2025 राजी मुलाखती घेण्यात येतील. तसेच उमेदवारांनी मुलाखतस येताना स्वतःची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. तरी सोलापूर जिल्ह्यातील पात्र व इच्छूक युध्द विधवा व माजी सैनिक विधवा पत्नींनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सोलापूर यांनी केले आहे.

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर येथे अशासकीय लिपिक पदासाठी अर्ज करण्याचे अवाहन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर येथे 01 लिपिक टंकलेखक हे अशासकीय पद मेस्को मार्फत भरावयाचे असून सोलापूर जिल्ह्यातील फक्त माजी सैनिक रोजगार पटावर नोंद आहे. त्यांनाच प्राधान्य देण्यात येईल. तरी दि. 03 सप्टेंबर 2025 पुर्वी या कार्यालयात आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह (मुळ कागदपत्र व त्यांची छायांकित प्रती 02) सादर करावे. प्राप्त अर्जामधील उमेदवारांची दि. 03 सप्टेंबर 2025 रोजी मुलाखती घेण्यात येतील.

सदर पदाकरीता मराठी टंकलेखनाचा वेग दर मिनिट किमान 30 शब्द असल्याचे वाणिज्य प्रमाणपत्र तसेच महाराष्ट्र शासनाचे MS-CIT प्रमाणपत्र धारण केलेले असावे किंवा मराठी टंकलेखन येणे अनिवार्य राहिल. तरी सदर संधीचा सोलापूर जिल्ह्यातील माजी सैनिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुंसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

१९६७ ते २०२५ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचे निवडश्रेणी साठी जेष्ठता यादी तयार करणार - कादर शेख

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण विभागातून १९६७ ते २०२५ या वर्षात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना निवडश्रेणी देण्यासाठी सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात येईल असे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या पदाधीकाऱ्यानां सांगीतले.

सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील १९६७ ते २०२५ या काळात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना शासनाच्या ४ एप्रिल १९९० च्या आदेशानुसार पात्र शिक्षकांना त्रिस्तरीय चटोपाध्याय वेतनश्रेणी मधील निवडश्रेणी देण्यासाठी वर्षाला पात्र शिक्षकांच्या २०% प्रमाणात सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात यावी यासाठी सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने शिक्षणाधिकारी कादर शेख यांना भेटून निवेदन दिले या वेळी पुणे विभागीय अध्यक्ष सिध्देश्वर धसाडे, जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघटना अध्यक्ष सुभाष फुलारी, सरचिटणीस मल्लीकार्जून बडदाळजिल्हा कार्याध्यक्ष काळप्पा सुतार, उत्तर सोलापूर अध्यक्ष सिद्राम जिरगे, जेष्ठ मार्गदर्शक शिवशंकर विजापूरे, नितीन कुलकर्णी, मल्लीकार्जून शेगाव शहापुरे आदी उपस्थित होते.

या पूर्वी कांही ठराविक शिक्षक प्रस्ताव दाखल केले त्यानाच निवडश्रेणी देण्यात आली आहे त्रिस्तरीय चटोपाध्याय निवडश्रेणी सन १९८६ पासून मंजूर आहे दरवर्षी २०% प्रमाणात ३९ वर्षाचे देणे बाकी आहे निवडश्रेणीस पात्र ठरलेला शिक्षकांचा सेवाजेष्ठता यादी तयार करून ३९ वर्षाचे अनुशेष भरून काढण्यात यावी असे मागणी करण्यात आली आहे.

भिम उर्फ आकाश विलास गुरव सोलापूर व धाराशीव जिल्हयातून २ वर्षाकरीता तडीपार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- इसम नामे, भिम उर्फ आकाश विलास गुरव, वय ३५ वर्षे, रा. घर नं. ११४, अभिमानश्री नगर, मुरारजी पेठ, सोलापूर याचेविरुध्द सन सन २०१३, २०१५, २०१८, २०२१ व सन २०२५ या कालावधीमध्ये सामान्य नागरीकांना मारहाण करुन दहशत निर्माण करणे, व्यापा-यांना मारहाण व दमदाटी करुन पैशांची मागणी करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याचेविरुध्द फौजदार चावडी पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावाचे अनुषंगाने विजय कबाडे, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांनी कार्यवाही करुन त्यांचेकडील तडीपार आदेश क्र. २०७७/२०२५ दि.१२/०८/२०२५ अन्वये, इसम नामे, भिम उर्फ आकाश विलास गुरव, वय - ३५ वर्षे, रा. घर नं. ११४, अभिमानश्री नगर, मुरारजी पेठ, सोलापूर यास सोलापूर व धाराशीव जिल्हा येथून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे. त्यास तडीपार केल्यानंतर लातूर येथे सोडण्यात आले आहे.

अभिनेते सयाजी शिंदे यांना जगद्गुरू संत तुकाराम महाराज पर्यावरण जीवन गौरव पुरस्कार जाहीर

पुणे (कटूसत्य वृत्त):- पद्मश्री शंकर बापू आपेगावकर चॅरिटेबल ट्रस्ट, निर्मिती मीडिया सोल्युशन्स आणि शीलराज स्टुडिओ संगीत विद्यालय यांनी पर्यावरण क्षेत्रातील विशेष कामगिरीबद्दल प्रसिद्ध अभिनेते आणि सह्याद्री देवराई फाऊंडेशनचे संस्थापक सयाजी शिंदे यांना पर्यावरण क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल जगद्गुरू संत तुकाराम महाराज पर्यावरण जीवन गौरव पुरस्कार 2025 जाहीर केला आहे.

पद्मश्री शंकर बापू आपेगावकर चॅरिटेबल ट्रस्ट धाराशिवचे विवेक विष्णू गपाट, निर्मिती मीडिया सोल्युशनचे देविदास कैलास झुरुंगे आणि शैलराज म्युझिक स्टुडिओ व संगीत विद्यालयाचे सुधीर चव्हाण यांनी या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले आहे. सदर पुरस्कार वितरण समारंभ ३० ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५:०० वाजता श्री रामचंद्र बनकर सभागृह, गोधळेनगर, हडपसर, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे.

जिल्ह्यात ४१५४ सार्वजनिक गणेश मंडळांना परवानगी; 'एक गाव-एक गणपती' चालना

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यात यंदा ४१५४ सार्वजनिक गणेश मंडळांना मूर्ती प्रतिष्ठापनेची परवानगी देण्यात आली आहे. यापैकी ११४० शहरी भागात तर ३०१४ ग्रामीण भागातील मंडळे आहेत. ग्रामीण भागात २५८ गावांनी 'एक गाव-एक गणपती' संकल्पनेअंतर्गत उत्सव साजरा करण्याचे ठरवले आहे. पोलिसांनी सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना नोटीस जारी करून उत्सवादरम्यान नियमांचे पालन करण्याची हमी घेतली आहे. गतवर्षी २६८ गावांनी 'एक गाव-एक गणपती' संकल्पना राबविली होती. शहरात नवीन मंडळांना परवानगी दिली जात नसल्याने मंडळांची संख्या जवळपास स्थिर राहिली आहे.

अंदाजे शहरात १.२५ लाख आणि ग्रामीण भागात ५ लाखांहून अधिक घरांमध्ये खाजगी गणपती स्थापनेची अपेक्षा आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे निवासी आयुक्त आर. विमला यांचे आवाहन

नवी दिल्ली (कटुवृत्त सेवा): महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ 'म्हाटी' महाराष्ट्र एम्पोरियम येथे सुरू असलेल्या गणेशमूर्ती विक्री प्रदर्शनास निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी भेट देऊन पाहणी केली.

'गणेश उत्सव' हा राज्य उत्सव म्हणून साजरा करण्यात येणार आहे. राजधानी दिल्लीत मराठी तसेच मराठी भाषिक भाविकही मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा करीत असून महाराष्ट्र शासनाच्या लघुउद्योग विकास महामंडळाकडून दरवर्षी पर्यावरणपूरक अशा गणेश मूर्तीचे विक्री प्रदर्शन लावण्यात येते. ही खुप समाधानाची बाब असल्याचे नमूद करून श्रीमती विमला यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. शाडू मातीच्या गणेशमूर्तीमुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाते. निसगार्शी आपली नाळ घट्ट राहावी यासाठी अशा उपक्रमांना प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले

श्रीमती विमला यांनी ठाण्याचे मूर्तिकार मंदार सुर्यकांत शिंदे यांच्या कलाकृतींचे विशेष कौतुक करताना म्हटले, 'या गणेशमूर्ती अतिशय आकर्षक, सुंदर आणि मनोहारी असून त्यातून परंपरा, कला आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम त्यांच्या सृजनशीलतेत दिसून येतो. 'त्याचप्रमाणे, 'लालबागचा गणपती आणि पुण्याच्या दगडूशेठ हलवाई गणपतीच्या प्रतीकृती पाहून मन प्रसन्न झाले. अशा अप्रतिम कलाकृतींमुळे महाराष्ट्राची समृद्ध परंपरा आणि भक्तीभाव दिल्लीकरांना जवळून अनुभवता येतो,' अशा भावना व्यक्त केल्या.

यावेळी श्री. शिंदे यांनी आर. विमला यांना 'श्री' ची मूर्ती भेट देऊन स्वागत व सन्मान केला. मूर्तिकार शिंदे यांच्या कलाकृतींसह अनेक नामवंत मूर्तिकारांच्या मूर्ती या प्रदर्शनात ठेवण्यात आल्या आहेत.

'मऱ्हाटी' महाराष्ट्र एम्पोरियममधील हे प्रदर्शन 27 ऑगस्टपर्यंत सकाळी 10 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. येथे 6 इंचांपासून ते 3 फूट उंचीपर्यंतच्या सुमारे 500 शाडू मातीच्या गणेशमूर्ती विक्रीसाठी उपलब्ध असून, त्यांची किंमत 600 ते 30,000 रुपयांपर्यंत आहे. सजावटीसाठी लागणारे साहित्यदेखील येथे मिळत आहे.

गेल्या तीस वर्षांपासून महाराष्ट्र एम्पोरियममध्ये गणेशमूर्ती विक्री प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. अधिक माहितीसाठी 011-23363366 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी सांगितले.

ऑर्किडच्या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्व.जयंत नारळीकरांच्या स्मृतींना दिला उजाळा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कुलमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे सोलापूर विज्ञान केंद्राचे प्रमुख राहुल दास यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा वषार्ताई विभुते, संस्थेच्या विश्वस्त नंदिनी करजगी, यशराज करजगी, स्कुलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, स्कुलच्या मार्गदर्शिका मीना पारखे, तसेच सेंट जोसेफ स्कूल बाशीर्चे प्राचार्य फादर वर्गीस, आर्या पब्लीक स्कूल माढाचे प्राचार्य सागर थोरात, संगमेश्वर पब्लीक स्कूलच्या प्राचार्या प्रियांका समुद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे राहुल दास यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीला सलाम असून त्यांनी असेच नवनवीन प्रयोग करून आपल्या शाळेचा व स्वतःचा नावलौकिक वाढवावा असे प्रतिपादन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर प्रयोग करीत महाराष्ट्राचे सुपुत्र तथा प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ स्व.जयंत नारळीकर यांना अनोख्या पद्धतीने आदरांजली वाहिली. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी भारतीय शास्त्रज्ञाची माहिती देणारे विविध भित्तीपत्रके, चंद्रयान, ए.आय.तंत्रज्ञान रोबोट, ड्रोन, लेजर होम सिक्युरिटी, मॅग्नेटीक कार, कार्बन गन, सोलार मोटार, सोलार सुनामी अलर्ट, ड्रेनेज सिस्टीम, सोलार सिग्नल, रेनवॉटर अलर्ट अशा विविध प्रयोगाची उपकरणे बनवून आपले कौशल्य सिद्ध केले. या प्रदर्शनास पालक वर्गानी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत विद्यार्थ्यांना शाबासकीची थाप दिली.

या उदघाटन समारंभाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन इयत्ता १० वी तील मानसी मोरे हिने केले.विज्ञान प्रदर्शना सोबतच यावर्षी सी बी एस ई 'हब ऑफ लर्निंग' अंतर्गत विज्ञान प्रकल्प स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते विजयी संघाना बक्षिस वितरण करण्यात आले. बक्षिस समारंभाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन तुलसाश्री चितारी यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

गणेशोत्सव उत्साहात व शांततेत साजरा करावा : सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर शहर व तालुक्यात सर्वधर्मीय सण, उत्सव आतापर्यंत उत्साहाने आणि सामाजिक सलोखा जपत साजरे झाले आहेत. हीच परंपरा कायम ठेवत यंदाचा गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद शांततामय व उत्साहपूर्ण वातावरणात तसेच डॉल्बीमुक्त वातावरणात साजरे करावेत, असे आवाहन सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे.

गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद या सण उत्सवाच्या निमित्ताने शांतता समितीची बैठक रखुमाई पोलीस संकुल येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दीपक धोत्रे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, टी वाय मुजावर,पोलीस पाटील, रेखा घनवट, मूर्तिकार डीजेचे मालक तसेच शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी सहा. पोलीस अधीक्षक डगळे म्हणाले, नागरिकांना ध्वनीप्रदुषणाचा त्रास होवू नये यासाठी डीजेचा वापर न करता पारंपारिक वाद्यांचा वापर करावा. लेजर शोचा वापर टाळावा.पर्यावरण पूरक गणेश मूर्तीची स्थापना करावी. गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपाचा रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. मंडळांनी विविध सामाजिक उपक्रम राबवावेत. महिला, वृद्ध व बालके यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपयोजना कराव्यात. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकांसाठी जे मार्ग तसेच विसर्जनाची जागा निश्चित केले आहेत त्या ठिकाणी विसर्जन करावे तसेच मिरवणुकीसाठी दिलेल्या वेळेची मर्यादा पाळावी.

गणेशोत्सव साजरा करताना कुणाच्याही भावना दुखावणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. सोशल मीडियावर तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट करु नयेत. मंडळानी स्वयंसेवक नेमावेत. तसेच सीसीटिव्ही लावावेत.जाहिरात फलक लावतांना आवश्यक परवानगी घ्यावी. जाहिरात फलकावरील मजकुर जातीय, धार्मिक द्वेष निर्माण करणारे नसावेत. वर्गणीसाठी कुणावरही जबरदस्ती करु नये, विसर्जनावेळी पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी. उत्सव साजरे करताना कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोर पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही सहाय्यक पोलीस अधीक्षक ढगळे यांनी केले आहे.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे म्हणाले गणेशोत्सव हा सर्वांचा आवडता सण आहे. हा सण सर्वजण जल्लोषात व उत्साहात साजरा करतात. यावर्षी देखील गणेशोत्सव साजरा करतांना कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाहीत याची सर्वांनी दक्षता घ्यावी. गणेश मंडळांनी देखावे, आरास करतांना शासनाच्या विविध लोकोपयोगी योजनांवर आधारित आरास करावी.

गणेशोत्सवाबाबत गणेशमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या अडचणी, सूचनांवर संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

तसेच नगरपालिका प्रशासनाकडून गणेशोत्सवानिमित्त शहरातील रस्त्यांची डागडुगी, मोकाट जनावरे तसेच आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल असे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

यावेळी विविध गणेशमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना येणाऱ्या अडचणी तसेच काही सुचना मांडल्या.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) महाराष्ट्राचे राष्ट्रवादीतून पुढे आलेले एक नेते
२) एक हिंदी सिनेनिर्माते-** चोप्रा ३) डाळ अथवा भात शिजवण्यासाठी याचा वापर करतात ४) आडातून पाणी खेचण्याचे चक्राकार साधन
५) सलमान खानचा थोरला भाऊ
६) भारतीय क्रिकेट टीममधील ऐंशीच्या दशकातील अष्टपैलू खेळाडू ११) दात
१३) मोठी पेटी
१६) पाठवणे, **** करणे
२०) सूट, मोकळीक
२२) महादेवाचे एक नाव २४) महाराष्ट्रातील एक जिल्हा
२७) शरीर, काया
२८) कार उलट लिहा
२९) चांगला रूचकर स्वयंपाक बनविणारी स्त्री
३०) कपडे धुण्याचा एक साबण
३२) समुद्र ३३) बंदूक (इंग्रजीत)
३४) चरण ३६) हळू, मंद गतीने
३७) शुभकार्यासाठी उभारलेला छत
३९) सातत्याने, नेहमी
४१) पक्ष्याचे पंख, परंतु (हिंदीत)
४२) ईश्वर (हिंदीत),४६) श्रीविष्णू पत्नी
४७) गंध, परिमळ

आडवे शब्द : १) हेराफेरी चित्रपटातील एक प्रमुख अभिनेता
५) अभिनेता असलेला अमिताभ बच्चन यांच्या मुलाचे नाव ७) संशय ८) एक म्हण-*** तो वजीर ९) एक म्हण-बळी तो कान ** १०) जरचा साथीदार १२) घोडेसवारी, फेरफटका १४) ख्रिश्चन बांधवाचा पवित्र धर्मग्रंथ १५) एखाद्या कामासाठी स्वत:जवळचे पैसे खर्च करणे-***मोड करणे १७) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक १८) उणीव, टंचाई १९) धान्याचा ढीग २१) स्पेशल, विशेष २३) उमर (मराठीत) २५) महिलांचा नाकात घालण्याचा एक दागिना २६) वतनाचा मालक २९) शेतातील कामाचा हंगाम ३०) खलनायक (इंग्रजीत) ३१) तक्रार, फिर्याद (हिंदीत) ३१) फर्निचरसाठी या झाडाचे लाकूड वापरतात
३३) चूक, चुकीचे (हिंदीत) ३४) ब्रेड (मराठीत)
३५) मान (हिंदीत) ३६) दुधावरील मलई ३७) आठवड्यातील एक दिवस-***वार, एक उपग्रह ३८) वाळूचे मैदान ३९) प्रॅक्टीस (मराठीत) ४०) कडूच्या विरूध्दार्थी शब्द ४१) माघारी देणे, माघारी करणे-*** देणे ४३) श्रवणेंद्रिय
४५) कालच्या अगोदरचा दिवस ४८) लिंबू पाण्याचे पेय
४९) भारताचे माजी कृषिमंत्री-*** पवार
५०) महिना

सुडोकु - 35

5		9		1			8	2
8	3	1		5				
6		2	9			1		
4	1		3		8	2	9	
9	2		5	6	1			7
			4	2				8
	8				6	3		5
		7		3		6		
	9			4	5			

पुणे - सोलापूर महामार्गावर विचित्र अपघात

कारने २ अलिशान गाड्यांना उडवले, दोघांचा जागीच मृत्यू

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पुणे - सोलापूर महामार्गावर यवतजवळ अतिशय भयंकर अपघात झाला आहे. यवतमध्ये एका कारने दुभाजक ओलांडून दुसऱ्या बाजूच्या दोन आलिशान गाड्यांना जोरात धडक दिली. या विचित्र अन भयंकर अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर 5 जण जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर पुणे-सोलापूर महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. यवत पोलिसांनी तात्काळ घटनास्थळावर धाव घेतली अन वाहतूक सुरळीत केली. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला केली. त्यानंतर मृतदेह

पोस्टमार्टमासाठी पाठवले. या अपघातातील मयतमध्ये उरुळी कांचन व यवत येथील दोघांचा समावेश आहे. तर जखमींची नावे अद्याप समजू शकली नाहीत.

उरळी कांचनमधील अशोक विश्वनाथराव थोरबोले आणि यवतमधील गणेश धनंजय दोरगे यांचा या अपघातात जागेवरच मृत्यू झाला. अपघातात मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत. याबाबत ज्ञानेश्वर विश्वनाथ थोरबोले यांनी यवत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार राकेश मारूती भोसले (रा. बोरीभडक ता. दौंड) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.

यवत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास ज्ञानेश्वर थोरबोले हे त्यांच्या जवळ असलेल्या चारचाकी गाडीतून सोलापूरच्या दिशेने निघाले होते. यावेळी पुणे - सोलापूर महामार्गावरून राकेश भोसले हा सोलापूरच्या बाजूकडून पुण्याकडे निघाला होता. यावेळी त्याचे त्यांच्या लाल रंगाच्या गाडीवरील नियंत्रण सुटले व गाडी थेट दुभाजक ओलांडून समोरून येणाऱ्या दोन चारचाकी गाड्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात अशोक थोरबोले व गणेश दोरगे यांना जोरदार मार लागला होता. त्यांना तात्काळ नागरिकांच्या मदतीने यवत व उरुळी कांचन येथील रुग्णालयात दाखल केले असता दोघांचाही मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले.

सप्टेंबरअखेर सोलापूर-मुंबई विमानसेवा सुरू

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूरकरांची दीर्घकाळ प्रलंबित असलेली सोलापूर ते मुंबई विमानसेवेची मागणी आता पूर्णत्वास येत आहे. नागरी उड्डाण महानिदेशालय **(DGCA)** यांच्याकडून स्टार एअरला सोलापूर ते मुंबई प्रवासी विमान सेवा सुरू करण्याची परवानगी मिळाली असून ही सेवा सप्टेंबर 2025 अखेरपर्यंत सुरू होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

महाराष्ट्र एअरपोर्ट ऑथॉरिटी व स्टार एअर यांच्यातील करारानंतर ही सेवा सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लवकरच स्टार एअर तिकीट विक्रीला प्रारंभ करणार असून सप्टेंबर अखेरीस पहिले प्रवासी विमान सोलापूरहून मुंबईकडे रवाना होणार आहे. या सेवेमुळे

सोलापूर शहराला औद्योगिक, व्यापारी, पर्यटन आणि शैक्षणिक विकासाला मोठा हातभार लागणार असून नागरिकांना थेट मुंबईशी हवाई मार्गे जोडले जाण्याचा लाभ मिळणार आहे.

दरम्यान, राज्य शासनाने 'उडान' योजनेअंतर्गत सोलापूर-पुणे-मुंबई विमानसेवा सुरू करण्यासाठी 14 कोटी रुपयांची व्हायाबिलिटी गॅप फंडिंगची तरतूद केली आहे. उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयाला मंजुरी देण्यात आली आहे.

महापालिकेकडून आता प्रभागनिहाय स्वच्छता

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर करण्याकडे भर दिला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिका प्रशासनात ३६५ दिवस शहर स्वच्छताचे नियोजन करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार महानगरपालिकेने २६ प्रभागांमध्ये स्वच्छता मोहिमेचा विशेष आराखडा तयार केला आहे. त्यासाठी एक समिती गठीत केली आहे. या

समितीच्या माध्यमातून २६ प्रभागांमध्ये एकाचवेळी दररोज विशेष स्वच्छता मोहीम घेतली जाणार आहे.

महापालिकेच्या घनकचरा विभागाच्या वतीने शहरांमध्ये विविध स्वच्छता म्हणून राबवल्या जात आहेत. आतापर्यंत चार विशेष स्वच्छता मोहिम घेण्यात आल्या. रस्ते, चौक, रस्ते दुभाजक, स्मशानभूमी, चौक चकाचक करण्यात आले. मात्र १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री जयकुमार मोरे आणि शहरातील स्वच्छता मोहिमेचा, शहरातील कचरा संकलनाचा आढावा घेतला. यामध्ये शहर स्वच्छतेला प्राधान्य ३६५ दिवस म्हणजे वर्षभर स्वच्छता मोहिम घेण्याचा आराखडा तयार करण्याच्या सूचना केल्या होत्या.

प्रभागनिहाय स्वच्छता करण्याचे नियोजन केले आहे. चार जणांची समिती गठित केली आहे. प्रभाग निहाय स्वच्छता केली जाणार आहे प्रत्येक प्रभाग निहाय नियंत्रण अधिकारी म्हणून जबाबदारी देऊन अतिरिक्त मनुष्यबळ, कचरा विभागातील कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून स्वच्छता मोहीम मोहीम राबवली जाणार आहे. त्या मोहिमेसाठी लागणारी यंत्रणा, साहित्य, निधी, कोणत्या भागात कधी, कशी स्वच्छता केली जाणार याबाबतचा वर्षभराचे नियोजन केले आहे.

शासनाकडून १५ कोटी रुपयांचा निधी घनकचरा विभागात मिळाला असून त्यासाठी संकलन केंद्र आणि घंटागाड्यांच्या खरेदीसाठी नियोजन त्यानुसार महापालिका प्रशासनाने केले जाणार आहे.

मानेगाव येथे सकल मराठा समाजाचा मेळावा

मानेगाव (कटूसत्य वृत्त):- शासनाने सकल मराठा समाजाचे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवले आहेत. या पार्श्वभूमीवर मराठा समाजाला कायमस्वरूपी टिकणारे ओबीसी संवगार्तून सरसकट आरक्षण दिले पाहिजे. 'सगेसोयरे' अध्यादेशाची तातडीने अंमलबजावणी झाली पाहिजे, आदी

मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, दि.२९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येणाऱ्या भव्य विराट मोचार्साठी सोलापूर जिल्ह्यातून लाखोंच्या संख्येने समर्थकांनी उत्स्फूर्तपणे उपस्थित रहावे, असे आवाहन सकल मराठा समाजाचे जिल्हा समन्वयक माऊली पवार यांनी केले आहे.

मानेगाव (ता. माढा) येथे आयोजित सकल मराठा समाज व इतर समाजातील मराठा आरक्षण समर्थकांच्या भव्य मेळाव्यात ते बोलत होते. पुढे बोलताना माऊली पवार यांनी सांगितले की, मराठा आरक्षणाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी वेळोवेळी आमरण उपोषण, भव्य विराट मोर्चे व आंदोलने करून मराठा समाजातील सुमारे ५८ लाख जणांना कुणबी-मराठा प्रमाणपत्र मिळाले आहे. उर्वरित मराठा समाज व त्यांच्या सगेसोय-यांना सरसकट ओबीसी संवगार्तून कायमस्वरूपी टिकणारे आरक्षण मिळाले पाहिजे. या उद्देशाने हा मोर्चा व आंदोलन केले जाणार आहे. शासनाचा वेळकाढूपणा व दिरंगाईचे धोरण हे मराठा समाजासाठी अन्यायकारक आहे. समाजाला न्याय व हक्क मिळाला पाहिजे ही भूमिका जरांगे-पाटील यांची आहे.

यावेळी बुद्रुकवाडी येथील सकल मराठा समाजाच्या तीघांना कुणबी-मराठा समाजाचे प्रमाणपत्राचे वितरण जिल्हा समन्वयक माऊली पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मानेगाव व परिसरातील गावांतील सकल मराठा समाजाचे लोक उपस्थित होते.

केळी निर्यातकरिता केलेल्या योगदानाबद्दल 'विठ्ठलगंगा'चा गौरव

कन्हेरगांव (कटूसत्य वृत्त):- तामिळनाडूतील तिरुचिरापल्ली येथे आय. सी.ए.आर. राष्ट्रीय केळी संशोधन केंद्राच्या ३२ व्या वर्धापन दिन व किसान मेळाव्याचे औचित्याने आयोजित समारंभात विठ्ठलगंगा

फार्मर्स प्रोड्युसर कंपनीला 'बेस्ट बनाना एफपीसीएल ॲवार्ड' ने गौरविण्यात आले.

हा पुरस्कार केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या संघटनात्मक बळकटीकरणासाठी, शाश्वत शेती पद्धतींसाठी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दर्जेदार भारतीय केळी निर्यात करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला. सोलापूर जिल्हा हा देशातील सर्वात मोठ्या केळी उत्पादक पट्ट्यांपैकी एक आहे. या भागातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, सेंद्रिय व शाश्वत शेती पद्धती, नियार्तीसाठी आवश्यक दर्जा नियंत्रण व प्रक्रिया सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम विठ्ठल गंगा एफपीसीएलने केले आहे. अत्याधुनिक पॅक हाऊस सुविधा, मोठ्या क्षमतेचे कोल्ड स्टोरेज, आधुनिक

हा सन्मान प्रत्येक शेतकऱ्याचा हा पुरस्कार केवळ आमच्या संस्थेचा नाही तर प्रत्येक शेतकरी सदस्याच्या मेहनतीचा आणि सर्व भागीदारांच्या विश्वासाचा गौरव आहे. संस्थेच्या स्थापनेपासून आम्ही शेतकऱ्यांना थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादनाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील आहोत. आगामी काळात विठ्ठलगंगा एफपीसीएलचे ध्येय शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे, आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रक्रिया व पॅकिंग युनिट्स उभारणे, नव्या बाजारपेठांशी व्यापार करार करणे तसेच भारतीय केळीला 'जागतिक ब्रॅण्ड' म्हणून ओळख निर्माण करणे हे असेल.

- धनराज शिंदे, चेअरमन, विठ्ठलगंगा फार्मर्स प्रोड्युसर कंपनी

प्रयोगशाळा, गुणवत्ता तपासणी यंत्रणा, शेती निविष्ठा विक्री केंद्रे आणि शेतमालाचे थेट करार पद्धतीने विक्री यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

याप्रसंगी राष्ट्रीय केळी संशोधन केंद्राचे संचालक डॉ. सेल्वाराजन यांनी विठ्ठलगंगा एफपीसीएलच्या कार्याचे कौतुक करताना, 'संशोधनाधिष्ठित शेती, दर्जा नियंत्रण आणि नियार्तीसाठी लागणाऱ्या वैज्ञानिक पद्धती यांचा प्रभावी वापर करून विठ्ठलगंगा एफपीसीएलने देशातील इतर एफपीसीएलसाठी आदर्श निर्माण केला आहे,' असे प्रतिपादन केले.

माकपचे राज्यस्तरीय अभ्यास शिबिर सोलापूर येथे उत्साही वातावरणात सुरू

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- अखंड लढा व श्रमिकांच्या त्यागातून उभी राहिलेली ३० हजार असंघटीत कामगारांची वसाहत रे नगर आज जगात पथदर्शी ठरत आहे. या क्रांतिकारी नगरीत महाराष्ट्राला नवी दिशा देण्यासाठी सज्ज झालेल्या लढाऊ कार्यकर्त्यांची वैचारिक जडणघडण घडविण्यासाठी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)चे महाराष्ट्र राज्यस्तरीय तीन दिवसीय अभ्यास शिबिर उत्साही वातावरणात सुरू झाले.

शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी लाल झेंडा फडकावून शहिदांना अभिवादन करण्यात आले. प्रजा नाट्य मंडळाच्या कलावंतांनी क्रांतिकारी गीते सादर केली.

'लाल झेंडे को लाल सलाम!, शहिदोंके अरमानोंको मंझिल तक पहुंचाएंगे!, साम्राज्यवाद मुदार्बाद!, सांप्रदायिकता हो बरबाद!, दुनिया के मजदूर एक हो!' अशा जोरदार घोषणांनी यावेळी रे नगर परिसर दणाणून गेला.

सोलापूर जिल्ह्यातील नकोच्या कार्यकर्त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पक्ष व जनसंघटना मजबूत ठेवण्याचे अभूतपूर्व कार्य केले असल्याचे गौरवोद्गार माकप पॉलिट ब्युरो सदस्य कॉ. डॉ. अशोक ढवळे यांनी प्रतिनिधी आणि उपस्थितांसमोर बोलताना यावेळी काढले. आणि ह्लजनक्रांतीसाठी जनतेचा सहभाग अनिवार्य आहे. त्यांच्या राजकीय प्रबोधनाचे तंत्र हे अभ्यास शिबिर आत्मसात करेल,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मंचावर केंद्रीय समिती सदस्य कॉ. बादल सरोज, राज्य सचिव डॉ. अजित नवले, राज्य सचिवमंडळ सदस्य विजय गाभणे, ॲड. एम. एच. शेख, सुनील मालुसरे, शैलेंद्र कांबळे आणि किरण गहला, जिल्हा सचिव युसूफ मेजर, आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान राज्य सचिवमंडळ सदस्य शुभा शमीम यांनी भूषविले. राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी प्रास्ताविक केले, तर ॲड.एम. एच.शेख यांनी प्रतिनिधींचे स्वागत करून, दिवंगतांना आदरांजलीचा शोकप्रस्ताव मांडला.

सोलापूर जिल्हा समितीच्या वतीने डॉ. अशोक ढवळे व कॉ. बादल सरोज यांचा सोलापुरी श्रमिकांच्या श्रमाचे प्रतीक असलेली चादर देऊन सत्कार करण्यात आला.

मराठा समाजाचा रविवारी वधू-वर परिचय मेळावा

सेवा संघाचा उपक्रम: यंदाचा 31 वा मेळावा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मराठा सेवा संघ संचलित मराठा वधू- वर परिचय व सामुदायिक विवाह कक्षाच्या वतीने रविवार दि.24 ऑगस्ट रोजी मराठा वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले असल्याची माहिती मराठा सेवा संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील, जिल्हाध्यक्ष डॉ. जी.के देशमुख यांनी दिली.

मराठा सेवा संघाच्या वधू वर परिचय मेळाव्याचे यंदाचे 31 व वर्ष आहे. प्रति वर्षाप्रमाणे यंदा वधू -वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे. रविवार दि. 24 ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता आदित्य नगर येथील आदित्य संस्कृतिक भवन मध्ये वधू वर परिचय मेळावा पार पडणार आहे.

मनुष्य जीवनातील विवाह संस्थेला अन्यसाधारण महत्व आहे. समाज प्रबोधनातून सहभागातून ती भक्कम करण्यासाठी व विवाह संस्था बळकट व्हावी यासाठी मराठा सेवा संघाच्यावतीने प्रतिवर्षी वधू -वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले जाते. यंदाच्या वधू-वर मेळाव्याची नोंदणी देखील चालू झाली आहे. नोंदणीला मोठा प्रतिसाद मिळत आहे. शहराच्या विविध भागात ग्रामीण भागांमध्ये वधू- वर कक्षाच्या वतीने विविध बैठका घेऊन मेळाव्याची माहिती समाज बांधवा पर्यंत पोहचवली जात आहे. नियोजनाच्या बैठका देखिल पार पडल्या आहेत.

तरी इच्छुक वधू वरच्या पालकांनी वधू-वर परिचय मेळाव्यामध्ये सहभागी होऊन मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकाच्या वतीने केले आहे.

यासाठी जिल्हा वधू वर कक्षाचे जिल्हाध्यक्ष अंबादास सपकाळे, सदाशिव पवार, राम माने, सूर्यकांत पाटील, प्रकाश ननवरे, लक्ष्मण महाडिक, आर पी पाटील, नवनाथ कदम, राजू व्यवहारे, प्रकाश डोंगरे, गोवर्धन गुंड इत्यादी परिश्रम घेत आहेत.

पूरग्रस्त पंढरपूरकरांसाठी स्थलांतर व सोयीसुविधा उपलब्ध करून द्या : खा. प्रणिती शिंदे

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर, मंगळवेढा, मोहोळ तालुक्यामधील भीमा नदी काठावरील शहरी व ग्रामीण भागात पूर नियंत्रण कक्ष व संबंधित यंत्रणा सज्ज ठेवण्याबाबत सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने तहसीलदार सचिन लंगोटे यांच्या मार्फत प्रांताधिकारी पंढरपूर सचिन इतापे यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनाद्वारे खासदार प्रणिती शिंदे यांनी अशी मागणी केली की, सध्या उजनी व वीर धरणातून पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात येत आहे. यामुळे भीमा नदीची पाणी पातळी मोठ्या प्रमाणात वाढली असून पूर परिस्थिती निर्माण होत आहे. यामुळे भीमा नदीकाठचा पंढरपूर, मंगळवेढा, मोहोळ तालुक्यामधील व पंढरपूर शहरातील सखल भागात पाणी शिरत आहे. यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात स्थलांतर करावे

लागणार आहे. स्थलांतरास लागणाऱ्या उपाययोजना आपल्या प्रशासनामार्फत तात्काळ करण्यात याव्यात. तसेच पूरग्रस्त नागरिकांची इतर सुरक्षित ठिकाणी राहण्याची सोय करून त्यांना इतर सोयीझ्रसुविधा देण्याचे नियोजन करण्यात यावे, याकरिता आपली आपत्कालीन व्यवस्था सज्ज ठेवून संबंधित यंत्रणांना तात्काळ आदेश देण्यात यावेत.

तसेच ग्रामीण भागातील भीमा नदीकाठच्या परिसरातील नागरिकांचे स्थलांतर सुरक्षित ठिकाणी करावे व त्या स्थलांतरित नागरिकांना सर्व सोयी सुविधा पुरविण्यात यावेत, अशी मागणी केली

यावेळी पंढरपूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष अमर सूर्यवंशी, सोलापूर जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष संदीप पाटील, हणमंतू मोरे, अनिकेत देशमुख, विजयसिंह देशमुख, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, समाधान हाके, पद्मिनी शेट्टीयार आदी उपस्थित होते.

राष्ट्रवादीचे माजी आ. बबनदादा शिंदेंवर अमेरिकेत यशस्वी हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया

मुंबई (कटूसत्य वृत्त):- माढ्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार बबनराव शिंदे यांनी विधानसभा निवडणुकीनंतर अमेरिकेत जाऊन हृदयप्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला, त्यासाठी त्यांना तीन महिने अगोदर अमेरिकेतील सेंट लुईस येथील हॉस्पिटलमध्ये जाऊन राहावे लागले. मूळचे टेंभूर्णीचे पण सध्या अमेरिकेतील सेंट लुईस येथील बी. जे. सी. हॉस्पिटलचे डीन डॉ. अमित पावले यांनी बबनदादा शिंदे यांच्यावर यशस्वीपणे हृदयप्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया केली आहे. याबाबतची माहिती बबनदादांचे चिरंजीव रणजितसिंह शिंदे यांनी दिली.

माजी आमदार बबनराव शिंदे यांना गेली वीस वर्षापासून हृदयविकाराचा त्रास होता. सोलापूरचे हृदयरोग तज्ज्ञ डॉ. गुरुनाथ परळे यांच्याकडे त्यांच्यावर नियमित उपचार सुरू होते. बबनदादांवर यापूर्वी ऑजिओप्लॉस्टी आणि बायपासची शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यांचं हृदय केवळ ३० टक्केच काम करत होतं, त्यामुळे डॉ. परळे आणि इतर वैद्यकीय तज्ज्ञांनीही त्यांना हृदयप्रत्यारोपणाचा सल्ला दिला होता.

बबनराव शिंदे यांचा विश्वास वाढावा, हृदयप्रत्यारोपणासाठी ते सकारात्मक राहावेत, यासाठी हृदयरोपण शस्त्रक्रिया यशस्वी झालेल्या रुग्णांबरोबर त्यांची चर्चा घडवून आणली जात होती. संबंधित डॉक्टरांचा सल्ला घेतला जात होता. याचदरम्यान टेंभुर्णीचे डॉ. अमित पावले यांच्यासोबतही चर्चा झाली.

हृदयप्रत्यारोपणाची सोय भारतात चेन्नईमधील एका हॉस्पिटलमध्ये होती. मात्र, तेथील हॉस्पिटलचा हृदयप्रत्यारोपण सक्सेस रेट ९४

आमच्यासाठी मोठी गोष्ट : शंभूराजे मोरे

माढा तालुक्यासाठी माजी आमदार बबनराव शिंदे यांनी एवढं मोठं काम केले आहे. त्यामुळे बबनदादा आमच्याबरोबर राहावेत, अशी आमची इच्छा होती. बबनदादांवरील हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने आमची इच्छा पूर्ण झाली आहे. बबनदादांवरील शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने आमच्यासाठी पॉझिटिव्ह संदेश मिळाला आहे, ही आमच्यासाठी मोठी गोष्ट आहे, असेही शंभूराजे मोरे यांनी नमूद केले.

टक्के आहे, तर सेंट ल्यूईसचा १०० टक्के आहे. तसेच, डॉ. गुरुनाथ परळे यांनीही अमेरिकेतील सेंट ल्यूईस येथे ऑपरेशनचा सल्ला दिला होता. त्यानुसार अमेरिकेत हृदयप्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

डॉ. परळे आणि डॉ. पावले यांच्या सल्ल्यानुसार हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी माजी आमदार शिंदे हे १३ जून रोजी अमेरिकेतील सेंट लुईस येथील बी. जे. सी. हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते. तीन महिने डॉक्टरांच्या निगराणीखाली राहिल्यानंतर नुकतीच १८ ऑगस्ट रोजी बबनदादांवर डॉ. पावले यांनी हृदय प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया केली. त्यांच्यावरील शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याची माहिती त्यांचे चिरंजीव रणजितसिंह शिंदे यांनी दिली आहे.

दरम्यान, शस्त्रक्रियेनंतर आमदार बबनराव शिंदे यांची तब्येत व्यवस्थित असून ऑपरेशनच्या दिवशीच रोपण करण्यात आलेल्या हृदयाचे फंक्शनिंग सुरू झाले आहे. सर्व पॅरमीटर मॅच झाले आहेत. बिपी कमी किंवा जास्त होऊ नये, यासाठी सध्या औषधं दिली जात आहेत. इन्फेक्शनची (संसर्ग) भीती कमी झाल्यावर औषधांचा मात्रा कमी होतील, असेही बबनराव शिंदे यांचे निकटवर्तीय सोलापूर जिल्हा दूध संघाचे संचालक शंभूराजे मोरे यांनी सांगितले.

इन्फेक्शनचा धोका होऊ नये; म्हणून शस्त्रक्रिया झाल्यानंतरही बबनराव शिंदे यांना पुढील तीन महिने अमेरिकेत डॉक्टरांच्या निगराणीखाली ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर प्रत्येक महिन्याला तपासणीसाठी अमेरिकेत जावं लागणार आहे, असेही मोरे यांनी नमूद केले.

विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सवाची मिरवणूक यंदा डॉल्बीडीजे, लेसरमुक्त राहणार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- विजापूर रोड मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची श्री विसर्जन मिरवणूक यंदा डॉल्बीडीजे व लेसर शो मुक्त राहणार आहे, अशी माहिती मंडळाचे संस्थापक विजय शाबादे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या मंडळाची स्थापना 40 वर्षांपूर्वी करण्यात आली. यंदा श्री विसर्जन मिरवणूक डॉल्बी डीजे व लेसर शोशिवाय करण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. या निर्णयाला साथ न देणाऱ्या मंडळांना पोलिसांनी मिरवणुकीत सहभागी होण्यास परवानगी देऊ नये, अशी मागणी मंडळातर्फे पोलिसांकडे करण्यात आली आहे. एवढेच नव्हे डॉल्बी डीजेवर शासनाने बंदी घालावी अशी मागणी देखील आम्ही या निमित्ताने करत आहोत.

यंदा उत्सव काळात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी समाजात वावरताना जबाबदारीने कसे वागावे याबाबत जागृतीपर कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

यंदाच्या मिरवणुकीत आम्ही सर्व मंडळाना पारंपारिक वाद्यांचे लेझिम, ढोल, ताशा याचाच वापर करावा, असे आवाहन करीत आहोत. या उत्सवात आळंदीचे महाराज यांचे तीन दिवसीय प्रवचन व्दारकाधीश मंदिर येथे ठेवण्यात आले आहे. महिला व पुरुष यांची भजनदेखील स्पर्धा घेणार आहोत. दरसाल प्रमाणे याही वर्षी झाडे लावा झाडे जगवा हा उपक्रम राबवणार असून आत्तापर्यंत ५३८७ झाले लावलेली आहेत व ४१८५ झाडे जगवली आहेत. जेथे पाया तेथे छाया हा उपक्रम गेली दहा वर्षे राबवत आहोत. त्यामुळे जुळ्या सोलापूर भागात घर बांधत असतांना घरमालकांना एक रोप देऊन सहकार्य करीत आहोत. याचबरोबर देहदान, नेत्रदान, अवयवदान याच्या प्रचार व प्रसाराचे कामदेखील करीत आहोत, असे शाबादे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला उत्सव अध्यक्ष रवींद्र भोपळे, सचिव प्रसाद गाजरे, सुजाता म्हेत्रे, वैशाली माशाळ, बाळासाहेब पाटील, ॲड. संदीप बेंद्रे आदी उपस्थित होते.

परमिट जाहीरात

तमाम लोकास या जाहिर नोटीसने कळविण्यात येतेकी, मी श्रीमती भाग्यश्री सिद्धाराम चलगेरी असे जाहिर करते की माझे पती कै.सिद्धाराम यशवंत चलगेरी यांचा मृत्यू दि.०२/०५/२०२५ रोजी झाला आहे. तसेच माझ्या पतीचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी वाहन परवाना दिलेला आहे. सदर परवाना क्रमांक -MH2024-CC-1399C असे असून सदरचा परवाना हा वाहन क्र.- MH-13 EF 1078 या वाहनावर असून सदरचा परवाना श्रीमती भाग्यश्री सिद्धाराम चलगेरी पत्नी या नात्याने माझ्या नावे करून घ्यावयाचा आहे.

तरी सदरचा परवाना माझे नावाने करण्यास कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी सात (०७) दिवसाच्या आत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय येथे कागदोपत्रानिशी भेटावे.

सही/-
श्रीमती भाग्यश्री सिद्धाराम चलगेरी

जाहीर प्रसिध्दीकरण दि.कि.अर्ज.नं. ६४५/२०२५ नि-५

सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन एन. ए. मोर साहेब यांचे कोर्टात

१) श्रीमती कमळा महादेव बनसोडे वय: ४४ वर्षे, धंदा : घरकाम रा.समाज मंदीर जवळ, दहीटणे ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
२) श्री.मिलिंद महादेव बनसोडे वय:३० वर्षे, धंदा: मजूरी रा. वरीलप्रमाणे } अर्जदार
३) श्री. दयानंद महादेव बनसोडे वय:२८ वर्षे, धंदा: मजूरी रा. वरीलप्रमाण

विरूध्द

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत शंकर बाबुराव बनसोडे यांचे मृत्यूपश्चात त्यांचे नावे असेलेल्या सोलापूर महानगरपालिका हद्दीतील दहीटणे येथील ५२ पेट, १००/१/बी.पी. गावठाण हरिजन वस्ती त्याचा जुना मिळकत क्र ५२२०३७ व नवीन सर्वे नं 0200GB000958 ही १० बाय १० च्या दोन खोल्या असलेली घरजागा, या मिळकतीवर सोलापूर महानगरपालिकेच्या कर आकारणी रेकॉर्डला मयत शंकर बाबुराव बनसोडे यांचे मृत्युपश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांचे नावाची नोंद होण्याकरीता मे. कोर्टाकडून वारस दाखला मिळणकरीता हल्लीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे कामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून मे.कोर्टाने नेमलेली तारीख २४/०९/२०२५ रोजी किंवा ३० दिवसाच्या आत स्वतः अथवा आपले वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे, अन्यथा मूदतीत कोणचीही काहीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी केली जाईल. दिनांक २३/०८/२०२५

सही/- सही/- सहा. अधिक्षक
क.लिपीक (शिक्का) दिवाणी न्यायालय सोलापुर

जाहीर प्रसिध्दीकरण दि.कि.अर्ज.नं. ५६९/२०२५ नि-६

सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन मे. रेडकर साहेब यांचे कोर्टात

श्री. गणेश दत्तात्रय पवार,वय: ६२ वर्षे, धंदा निवृत्त रा. १३५५, भद्रावती पेठ, आंध्र भद्रावती समाज मंदिराजवळ, सोलापूर } अर्जदार

विरूध्द

कोणी नाही } सामनेवाला

मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ मधील न्यू पाच्छा पेठ येथील घरजागा यांसी म्यु. पल नं. १३५५ टि.पी.नं. १ यांसी सि.स.नं. १०३८१ पैकी फायनल प्लॉट नं.१६/१०३ ची जागा एकुण क्षेत्र १९४८ चौ.मीटर ची स्वतंत्र मालकीची यापैकी दक्षिणेची निम्मी जागा ९७.४ चौ.मी यात आर.सी.सी. बांधकाम तसेच खुलीजागा आहे. त्याची चतु:सीमा:--

पूर्वेस
फायनल प्लॉट नं. १६/१०४
पश्चिमेस :- रस्ता
दक्षिणेस
फायनल प्लॉट नं. १६ / ११९
उत्तरेस :- सदर नंबर पैकी जागा
जागा त्यातील तंदगभूत वस्तुसह.

ज्या अर्थी वर नमुद मिळकत ही यातील अर्जदार यांची आई कै. शंकरुबाई दत्तात्रय पवार यांच्या कब्जेवहिवाटीची व कब्जे मालकीची होती व आहे. सदरहु मयत यातील अर्जदार यांची आई कै. शंकरुबाई दत्तात्रय पवार हे दिना